21 TO 27 AUGUST 2023 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:47 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्षमणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ३५ सोमवार दि. २१ ऑगस्ट २०२३ ते रविवार दि. २७ ऑगस्ट २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## नांदायला येईना म्हणून पतीचे डोके फिरले हातोडा डोक्यात घालून पत्नीला ठार मारले



अकोला/क्राईम रिपोर्टर

पती -पत्नीचा संसार तेंव्हाच सुरळीत चालतो जेंव्हा दोघेही एकमेकांना सांभाळून घेतात. एकमेकांवर मनापासून प्रेम करतात. संसारात एकमेकांना मदत करतात. तेंव्हाच संसार सुखाचा होतो, पण काही पती पत्नीमध्ये शुल्लक कारणावरून भांडणे होतात. अशावेळी पतीकडून जर जास्तच त्रास होऊ लागला तर पत्नी सरळ माहेरची वाट धरते. ...पान २ वर

# पालिका आयुक्तांना देणार हितेंद्र ठाकूर फटके सर्वपक्षीय विरोधी पुढाऱ्यांना का बसले झटके




वसई/सोनू जाधव

**लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे नागरी सुविधांच्या बाबतीत लोकप्रतिनिधींच्या सूचना ऐकणे आणि त्यानुसार काम करणे प्रशासनाला बंधनकारक असते. पण प्रशासनात स्वतःला शहाणे समजणारे काही अधिकारी असतात आणि त्यांची अशी काही मनमानी सुरु असते कि लोकप्रतिनिधींनाही ते जुमानत नाहीत. अशावेळी एखाद्या लोकप्रतिनिधीने जर प्रशासकीय अधिकाऱ्यांची चारचौघात खरडपट्टी काढली तर त्यात त्या लोकप्रतिनिधीची काय चूक आहे. कारण शेवटी वीज, पाणी, रस्ते, आरोग्य, परिवहन या सेवांबाबत लोक डायरेक्ट प्रशासनाकडे जात नाहीत, तर ज्याला निवडून दिले आहे त्या लोकप्रतिनिधींकडे जातात आणि त्याला लोकांना उत्तरे द्यायची असतात. त्यामुळे प्रशासनाकडून जर कामे झाली नाही, तर प्रशासनाला जाब विचारण्याचा किंवा केलेल्या चुकांबाबत प्रशासनाचे कान पिरगळण्याचा अधिकार संविधानानेच लोकप्रतिनिधींना दिला आहे.**

विरारमध्ये १५ ऑगस्ट रोजी आयोजित जनता दरबारात पालिका प्रशासनाला आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पाण्याच्या प्रश्नावरून जाब विचारला. अशावेळी तिथे सुटाबुटात उपस्थित असलेल्या पालिका आयुक्तांनी आमदारांच्या प्रश्नाला उत्तरे द्यायला हवी होती. कारण वसई-विरार महापालिकेचे अनिलकुमार पवार हे आयुक्त आहेत. म्हणजेच प्रशासनाचे प्रमुख आहेत. पण जणू काही ते सत्कारालाच आलेले आहेत असे बसून होते आणि त्यांच्या हाताखालचे अधिकारी अर्धवट उत्तरे देत होते. हा प्रकार संतापजनक होता. त्यामुळे आमदार हितेंद्र ठाकूर चिडले आणि इतर पोपटांनी न बोलता आयुक्तांनी बोलावे असे ते म्हणाले. पण आयुक्तांची वाचा बसली होती. त्यामुळे चिडलेल्या ठाकुरांनी आयुक्तांना कार्यालयात येऊन फटकावण्याचा इशारा दिला. यात चुकीचे असे काहीच नाही आणि लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला धारेवर धरण्याची ही काही पहिलीच घटना नाही जे प्रहार संघटनेचे लोक आयुक्तांना फटकावण्याचा इशारा देणाऱ्या हितेंद्र ठाकुरांच्या विरोधात बोलत आहेत त्यांना त्यांचे नेते बच्चू कडू यांनी सरकारी अधिकाऱ्यांना थोबाडवल्याच्या घटनेचा कसा काय विसर पडला. पाण्यासाठी सर्व विरोधकांनी पालिका प्रशासनाच्या विरोधात मोर्चे काढले होते, तेंव्हा त्यांच्यासाठी प्रशासन वाईट होते, मग आताच त्यांना पालिका प्रशासनाचा पुळका का आला!

वसई-विरार महापालिकेची मुदत संपल्याने गेल्या ३ वर्षापासून महापालिकेत प्रशासक आहेत. अशावेळी प्रशासनाची मोठी जबाबदारी असते. खास करून नागरी सुविधांच्या बाबत मोठी जबाबदारी असते. लोकांना पाणी मिळत नाही. पावसाळ्यात शहरात पाणी तुंबते, त्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पालिकेकडून कोणत्याही उपाययोजना केलेल्या नाहीत. मुंबई उच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले असतानाही प्रशासनाने त्या आदेशाची अंमलबजावणी केलेली नाही. उलट वसई विरार ...पान ६ वर

## कोवळ्या कळीवर नजर ठेवणारा सुडाने पेटला नकार देताच आईसमोरच तिचा जीव घेतला





कल्याण/एस.कुमार

**आजकाल समाजात विकृतांची संख्या वाढत चालली आहे. पुरुषाच्या मनात स्त्रीविषयी आकर्षण निर्माण होणे नैसर्गिक असले तरी एखाद्या लहान मुलीच्या बाबतीत मोठ्या माणसाच्या मनात आकर्षण निर्माण होणे हि विकृतीच आहे. त्यामुळे अशा विकृताना जिवंत तत्काळ फासावर लटकावयाला हवे. कल्याणध्ये एका २५ वर्षाच्या तरुणाने १२ वर्षाच्या मुलीची तिच्या आईसामोरच निर्घुणपणे हत्या केली आणि स्वतःही फिनेल पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. काय तर म्हणे त्याचे तिच्यावर एकतर्फी प्रेम होते. २५ वर्षाच्या तरुणाने १२ वर्षाच्या मुलीवर एकतर्फी प्रेम करणे याला प्रेम म्हणत नाही तर वासना म्हणतात आणि १०-१२ वर्षाच्या मुली विषयी शारीरिक आकर्षण ज्यांच्या मनात निर्माण होते ते वासनांध असतात. त्यामुळे अशा वासनांध नाराधमाना तत्काळ फासावर लटकावयाला हवे, अशी संतप्त प्रतिक्रिया कल्याण मधील लोक व्यक्त करीत आहेत. त्याच बरोबर या घटनेमुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रात अल्पवयीन मुलीच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

कल्याण तिसगाव परिसरात एका २५ वर्षीय तरुणानं एका बारा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर आईच्या समोरच चाकूने भोसकून हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेने कल्याणमध्ये खळबळ उडाली असून कायदा आणि सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य महिला आयोगाने ही या घटनेची गंभीर दखल घेऊन पोलिसांना काही सूचना केल्या आहेत. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी पोलीस काही पावले ...पान २ वर



पोलिसांना निवेदन सादर करताना महिला पदाधिकारी

## पैसे नाही म्हणताच दारुड्याचे डोके फिरले ५० रुपयांसाठी मित्राच्या बापाला ठार मारले



सांगली/क्राईम रिपोर्टर

**दारुड्या माणसाला दारू मिळाली नाही कि तो एकदम वेडापिसा होतो. दारूसाठी तो कोणाच्याही पुढे हात पसरू लागतो. सांगलीतील विशाल देसाई याचीही तशीच गत झाली होती. दारूसाठी तो रस्त्यात येणाऱ्या-जाणाऱ्यांना अडवायचा त्यांच्याकडे पैसे मागायचा. नाही म्हटले कि जबरदस्तीने पैसे काढून घ्यायचा. एकेदवशी त्याने दारूसाठी मित्राचे वडील सुनील तरटे यांचा रस्ता अडवला आणि त्यांच्याकडे पैसे मागू लागला. आपल्या मुलाच्या मित्राची ही अवस्था बघून तरते चिडले आणि त्यांनी विशालच्या कानाखाली वाजवली. या गोष्टीचा विशाल याला भयंकर राग आला आणि त्याने सुनील याला रस्त्यातच आडवे घालून बेदम मारले आणि डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

सांगली शहर आणि परिसरात मोलमजुरी करणाऱ्याची संख्या जास्त आहे. जो तो पोटासाठी सकाळ पासून ...पान २ वर

## पावरा आणि खर्डे कुटुंबात शेतातच राडा झाला जमिनीच्या वादातून बाप व बेट्याचा जीव गेला









नंदुरबार/क्राईम रिपोर्टर

**ग्रामीण भागात शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन असते. त्यामुळे शतकरी जमिनीच्या तुकड्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो. जमिनीच्या वादातून ग्रामीण भागात आजवर अनेक जन प्राणाला मुकले आहेत. अगदी नात्यात सुद्धा खून खराब होऊन रक्ताचे पाटवाहिले आहेत. नंदुरबार जिल्ह्याच्या मालगाव येथेही अशाच एका घटनेत शेतीवरून खर्डे आणि पावरा कुटुंबात वाद होता, याच वादातून एकेदिवशी त्यांच्यात शेतातच राडा झाला आणि पाव्रणी खर्डे कुटुंबातील बाप लेकाची गोळ्या घालून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील मलगाव शिवारातील आदिवासी गावामध्ये खर्डे आणि पावरा परिवार रहातो. दोन्हीही कुटुंबे शेतीवर उदरनिर्वाह करतात. गेल्या काही वर्षापासून या दोन्ही परिवारामध्ये शेत जमिनीच्या तान्यावरून वाद चालू आहे. पावसाळा सुरू झाला की पेरणीच्या आरंभी या दोन्ही परिवारामध्ये याच कारणावरून हमखास वाद होत असे. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणारा शहादा तालुक्यातील मलगाव शिवारात एकमेकांच्या नात्यामध्ये अडकलेले व एकमेकांच्या सुख-दुःखात प्रसंगी समरस होणारे नातेवाईक वादाप्रसंगी एकमेकांना खावू की गिळू करू लागले आहेत. यंदाचा पावसाळा सुरू झाला आणि पेरणी करण्यासाठी खर्डे आणि पावरा परिवार तयारी करू लागले. ते दोन्ही परिवार त्याच जमिनीवर पेरणीसाठी आग्रही होते. त्याच कारणासाठी ...पान २ वर

## उसन्या पैशावरून मैत्रीत दुरावा आला मित्रानेच मित्राचा निर्घुणपणे खून केला



मयत अकबर





आरोपी महातेश

रायबाग (चिक्कोडी)/क्राईम रिपोर्टर

**मैत्रीत सहसा कोणी पैशाचे व्यवहार करू नयेत आणि जरी गरजेपोटी मित्राकडून पैसे घेण्याची वेळ आली तरी घेतलेले पैसे वेळेवर परत करावेत अन्यथा मैत्रीत दुरावा येतो आणि मैत्रीचे रुपांतर दुष्मनीत होऊन दोघे मित्र एकमेकांच्या जीवावर उठतात. त्यानंतर ते एकमेकांचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. रायबाग येथे दोन मित्रांमध्ये असाच प्रकार घडला. अकबरने महातेश कडून १० हजार रुपये उसने घेतले होते. पण परत करीत नव्हता, त्यातच त्याने महातेश याचा मोबाईल घेतला आणि त्यात असलेले गावातील एका तरुणीचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊ लागला. त्यामुळे चिडलेल्या महातेशने दारूच्या पार्टीच्या निमित्ताने अकबरला बोलून घेतले आणि त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महातेशला अटक केली आहे.**

अकबर शब्बीर जमादार हा हारुगिरी येथे आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. तो एका टेम्पोवर चालक म्हणून ...पान ६ वर

## चारित्र्याच्या संशयावरून पतीचा तोल गेला पत्नीला ठार मारून अपघाताचा बनाव केला



मयत नंदा चौरे

नाशिक/क्राईम रिपोर्टर

**पती पत्नीच्या नात्याला जेंव्हा संशयाचे ग्रहण लागते. तेंव्हा संसाराची घडी कधी विस्कटून जाते तेच कळत नाही. आपली पत्नी दुसऱ्याला लागू आहे असा संशय जेंव्हा पतीच्या मनात निर्माण होतो. तेंव्हा पतीच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. नाशिक मधील मच्छिंद्र चौरे याचा त्याची पत्नी नंदा चौरे हिच्या चारित्र्यावर संशय होता. याच संशयातून त्याने नंदाची हत्या केली आणि तिचा स्कूटीच्या अपघातात मृत्यू झाला असे भासवण्याचा प्रयत्न केला. पण कानून के हात बडे लंबे होते है हे त्याला कदाचित माहित नसावे. पोलिसांनी त्याचा बनाव मोडून काढला आणि त्याला अटक केली.**

संशयाचा किडा संसाराला पोखरुन खिळखिळे करुन टाकतो. पती पत्नीच्या नात्यातील विश्वासाला तर संशयाची वाळवी झपाट्याने पोखरुन टाकते. आपल्या सुख दुखा:त साथ देणाऱ्या पत्नीवर अनेकजण विनाकारण संशय घेऊ लागतात. हा संशय पराकोटीला गेला म्हणजे होत्याचे नव्हते होऊन जाते. बुधवार दि. २८ जून बुधवार २०२३ चा दिवस. सकाळी ११.०० वाजता आडगाव पोलीस ठाण्यात एक अपघाताची खबर आली. लोकमान्य हॉस्पिटलमधील डॉ.



ओमकार गवळी यांनी ही खबर दिली होती. त्यांनी सांगितले की, आडगावमध्ये रहाणाऱ्या नंदा चौरे या अपघातामध्ये जखमी ...पान ६ वर

## त्या दोघांच्या प्रेमाला सुडाची बाधा झाली चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीची हत्या केली



आरोपी अशोक

वाडा/क्राईम रिपोर्टर

**चारित्र्याचा संशय खूप वाईट असतो. त्यातून लोकांचे संसार उद्ध्वस्त होतात. घरात भांडणे सुरु होतात. कौटुंबिक शांतता आणि नात्यातील जिव्हाळा नष्ट होतो. संशयामुळे घरातील वातावरणच बदलून जाते. अशावेळी संशय वाढत गेला तर त्यातून सुडाची भावना निर्माण होते. कारण आपली पत्नी परपुरुषाच्या संपर्कात राहून आपल्याला फसवतेय हे जेंव्हा एखाद्या पतीला समजते तेंव्हा त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि सुडाची भावना खूप वाईट असते. त्यातून एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. वाड्याच्या किरवली येथील धानवापाडा येथील अशाच एका घटनेत चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.**

वाडा तालुक्यातील किरवली येथील धानवापाडा येथे चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीचा गळा आवळून जीवे ठार मारल्याची घटना घडली आहे. घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. गुरुवारी (दि. १७) सकाळच्या सुमारास वाडा तालुक्यातील किरवली येथील धानवापाडा येथे एका महिलेची हत्या झाली असल्याची माहिती वाडा पोलिसांना मिळाली, ही माहिती मिळताच वाडा पोलिसांची एक टीम घटनास्थळी रवाना झाली व घटनास्थळाला भेट ...पान २ वर

## रुळावर फेकलेल्याला मदत नाही केली सायन रेल्वे स्थानकात माणुसकी मेली





दुर्दैवी मयत विवेक

मुंबई/क्राईम रिपोर्टर

**मुंबईसारख्या गर्दीच्या शहरांमध्ये दर दिवशी लोकलमधून ८६ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी लोकल ट्रेनमध्ये प्रचंड अशी धक्काबुक्की होत असते. गर्दीत एकमेकांना धक्का लागणे ही काही नवीन बाब नाही, परंतु सायन रेल्वे स्थानकात एका महिलेला गर्दीमध्ये एका तरुणाचा धक्का लागला म्हणून त्या महिलेने व तिच्या पतीने त्यात तरुणाला रेल्वे प्लॅटफॉर्मवर मारहाण करून रेल्वे ट्रॅकवर ढकलले. वास्तविक माणुसकीच्या भावनेतून प्लॅटफॉर्म वरील इतर प्रवाशांनी त्याला मदतीचा हात द्यायला हवा होता, परंतु कोणीही त्याला मदतीचा हात देऊन प्लॅटफॉर्मवर घेतले नाही. परिणामी त्या तरुणाचा लोकल खाली चिरडून मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण मुंबईत मोठी खळबळ माजली असून त्यात तरुणाला रेल्वे ट्रॅकवरचा ढकलणाऱ्या पती-पत्नीला पोलिसांनी अटक केली आहे.** ...पान २ वर

21 TO 27 AUGUST 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:47 PM Page 1



पान १ वरून...

## नांदायला येईना म्हणून पतीचे डोके ...

अकोला जिल्ह्यातील उमरी गावात अशाच एका घटनेत पतीच्या त्रासाला कंटाळून पत्नी माहेरी गेली होती आणि पुन्हा नांदायला तयार नव्हती. त्यामुळे पतीने तिच्या डोक्यात हातोडा घालून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. जिल्ह्यातील मूर्तिजापुर तालुक्यात पतीने आपल्या पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मूर्तिजापुरच्या उमरी गावात हा प्रकार घडला. पत्नी घरी नांदायला येत नसल्याच्या कारणावरून पत्नी आणि पत्नीचे कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरात पत्नीच्या डोक्यावर हातोड्याने वार करून गंभीर जखमी केले. तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, पत्नीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पुनम समाधान राऊत (वय २३) असे मृत विवाहित महिलेचे नाव आहे. तर समाधान गौतम राऊत असं मारेकरी पतीचे नाव आहे. या प्रकरणी त्याच्या विरोधात मूर्तिजापुर ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील मूर्तिजापुर ग्रामीण पोलिस स्टेशब हद्दीतील उमरी येथे पतीने पत्नीवर हातोड्याने हल्ला केल्याची घटना १३ ऑगस्ट रोजी घडली होती. यामध्ये पत्नी गंभीररीत्या जखमी झाली, तिला आधी अकोला व नंतर नागपूरला उपचारार्थ दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान काल गुरुवारु तिचा मृत्यू झाला. उमरी गावातील प्रकाश खंडारे यांची मुलगी पुनम हिचा विवाह काही वर्षापूर्वी वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील मोरड गावातील रहिवासी समाधान गौतम राऊत याच्यासोबत झाला होता. लग्नाच्या सुरुवातीला काही दिवस चांगले गेले नंतर दोघांमध्ये छोट्या-छोट्या गोष्टीवरून वाद होऊ लागले. हा वाद असह्य झाल्याने पुनम गेल्या काही महिन्यांपासून तिच्या माहेरी वडिलांकडे राहायला आली. दरम्यान, १३ ऑगस्टला पुनम घरी एकटी होती. वडील शेतात कामाला गेलेले होते, तिचा पती समाधान हा घरी आला अन् त्याने पत्नीला सोबत चल म्हणून समजवण्याचा प्रयत्न केला. अनेकदा विनवणी केली, परंतु पुनमचा संसार थाटण्यास नकार होता. यावरून त्यांच्यात वाद सुरू झाला. या वादाच रूपांतर इककं झाल की त्याने थेट रागाच्या भरात पत्नी पुनमच्या डोक्यात हातोड्याने वार केले. यात ती गंभीररीत्या जखमी झाली. त्यानंतर समाधान घटनास्थळावरून फरार झाला. पुनमच्या डोक्याला मार लागल्याने कुटुंबीयांनी तिला मूर्तिजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु, रक्तस्त्राव जास्त झाल्याने पुढील उपचारासाठी अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि पुढे नागपूरला हलवण्यात आले. मात्र, उपचार सुरु असताना गुरुवारी पुनमचा मृत्यू झाला.

## कोवळ्या कळीवर नजर ठेवणारा...

उचलणार आहेत की नाही? असा सवाल अनेक राजकीय महिला संघटनानी उपस्थित केला आहे. कल्याण पूर्वमध्ये गेल्या दहा दिवसांत तीन घटना घडल्या आहेत. एका अल्पवयीन मुलीला भर रस्त्यामध्ये बलात्कार करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. दोन विविध ठिकाणी तरुणांवर कोयत्याने हल्ला केला. एका बारा वर्षीय मुलीची एकतर्फी प्रेमातून हत्या केली. कल्याण पूर्व परिसरात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले असून गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये पोलिसांचा धाक राहिलाय की नाही असा प्रश्न आता उपस्थित झाला. कल्याण पूर्वमधील तिसगाव परिसरात दुर्गा दर्शन सोसायटीमध्ये प्रणिती दास ही बारा वर्षाची मुलगी आपल्या आईवडिलांसह होती.१६ आगस्ट रोजी ती नेहमी प्रमाणे सायंकाळी खाजगी शिकवणीला गेली. शिकवणी संपल्यावर रात्री आठ वाजता आपल्या आई सोबत खासगी शिकवणी वर्गावरुन घरी येत होती. सोसायटीतील जिन्यातून घरात जात असताना एका माथेफिरू तरूणाने पाठीमागून येऊन प्रणितीच्या आईला ढकलून देऊन प्रणितीवर चाकूने सात ते आठ वार केले. तिच्या आईने मुलाला विरोध करण्याचा प्रयत्न केला.मात्र बेभान झालेल्या त्या तरुणाने आईला दाद दिली नाही. तिच्या आई समोरच या तरुणाने प्रणितीवर सपासप वार केले . छातीवर घाव झाल्याने प्रणिती दास ही मुलगी जिन्यात कोसळली.आईने आरडाओरडा करताच सोसायटीतील रहिवासी, पादचारी घटनास्थळी धाऊन आले. तो माथेफिरू तरुण तेथून पळून जात होता. रहिवाशांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. इकडे गंभीर जखमी झालेल्या प्रणिती हिला तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. तेथे उपचार सुरू करताच तिचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र देशमुख हे आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळ व मुतदेहाचा पंचनामा करून प्रेत पोस्टमोर्डमसाठी कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात रवाना केले. इकडे रहिवाशांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलेल्या हल्लेखोर तरुणाची कसून चौकशी केली असता वेगळी माहिती पुढे आली. आदित्य कांबळे (२५) असं या हल्लेखोर तरुणाचं नाव असून मागील काही दिवसांपासून प्रणिती हिचा तो पाठलाग करत करत होता. दोन वेळा त्याने तिला प्रपोज केलं होतं मात्र प्रणितीने त्याला दाद दिली नाही. ही गोष्ट तिने तिच्या आईच्या कानावर घातली होती. त्यादिवसा पासून प्रणितीची आई मुलीला शिकवणीवरून सुतल्यावर घ्यायला जात होती. आदित्य हा प्रणितीवर एकतर्फी प्रेम करत होता. ती त्याला भाव देत नव्हती ही गोष्ट त्याच्या जिव्हारी लागली. त्यातूनच त्याला तिचा प्रचंड राग आला. अखेर त्याने तिला संपवण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी संध्याकाळी सात वाजल्यापासून आरोपी आदित्य, दुर्गा दर्शन सोसायटीच्या आवारात येऊन रहिवाशांना संबंधित मुलगी घरी किती वाजता येते याची माहिती घेत होता. रहिवाशांना तो कशासाठी माहिती घेतो याची जाणीव झाली नाही. बुधवारी १६ आगस्ट रोजी रात्री ७ वाजता आदित्य मृत मुलगी राहत असलेल्या सोसायटी परिसरात दबा धरुन बसला होता. मृत मुलगी बुधवारी रात्री आठ वाजता आपल्या आई सोबत खासगी शिकवणी वर्गावरुन घरी येत होती. सोसायटीतील जिन्यातून घरात जात असताना आदित्यने पाठीमागून येऊन मुलीच्या आईला ढकलून देऊन मुलीवर चाकूने सात ते आठ वार केले. तिच्या आईने मुलाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. बेभान झालेल्या आदित्यने आईला दाद दिली नाही. छातीवर घाव झाल्याने मुलगी जिन्यात कोसळली. त्यानंतर आरोपी आदित्य कांबळे याने स्वतः फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. इकडे प्रणिती रक्ताच्या थारोळ्यात पडल्याने तिच्या आईने आरडाओरडा करताच सोसायटीतील रहिवासी, पादचारी घटनास्थळी धाऊन आले. आदित्य तेथून पळून जात होता. रहिवाशांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. गंभीर जखमी मुलीला तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. तेथे उपचार सुरू करताच प्रणिती दास या अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. हल्लेखोर आदित्यने दोन वेळा प्रेमासाठी गळ घातली होती. मुलीने त्यास नकार दिला होता. तो राग त्याच्या मनात होता. त्या रागातून त्याने हे कृत्य केले असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, आरोपी आदित्य कांबळे याला कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर कळवा येथील रुणालयात उपचार सुरु आहेत. या घटनेची महिला आयोगानं दखल घेतली आहे. कल्याण पोलीस स्टेशनमध्ये जाऊन कारवाईची माहिती घेतली. त्याच अनुषंगाने राज्य महिला आयोगाच्या सदस्य अडव्हॉकेट गौरी छाब्रिया यांनी गुरुवारी कल्याण कोळशेवाडी पोलीस ठाण्यात जाऊन वरिष्ठ पोलिसांकडून या सर्व प्रकरणाची माहिती घेतली. दरम्यान यावेळी आरोपीच्या कुटूंबाची माहिती गोळा करून आरोपीची मानसिकता काय होती याची चौकशी करावी, कोचिंग क्लासेस आणि सार्वजनिक ठिकाणी पोलिसांनी पेट्रोलिंग वाढवावे, त्याचबरोबर कोचिंग क्लासेसनी रात्री उशिरापर्यंत मुलींच्या क्लासेस घेऊ नये अशा प्रकारच्या सूचना छाब्रिया यांनी केल्यात. तसेच कोळशेवाडी पोलीस ठाण्याचा या प्रकरणाचा तपास प्राथमिक स्तरावर असून आरोपी संदर्भात आणखी चौकशी करून माहिती समोर येईल असे देखील छाब्रिया म्हणाल्या. इकडे या घटनेच्या निषेधार्थ अनेक राजकीय व सामाजिक संघटना यांनी कोळसेवाडी पोलिसांना निवेदन देऊन आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. भाजप महिला कार्यकत्यांनी शांतेच्या मार्गाने मोर्चा काढून या घटनेला निषेध केला आहे तर वंचित बहुजन आघाडीच्या महिला कार्यकर्त्यानी पोलिसांना निवेदन देऊन कारवाई ची मागणी केली आहे. एकंदरीत या घटनेने कल्याण मध्ये महिला आणि मुली सुरक्षित नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

## रुळावर फेकलेल्याला मदत नाही...

वाशिमच्या तरुणाची स्वप्नं मुंबापुरीत पूर्ण होण्याआधीच मुंबईतील सायन रेल्वे स्थानकात महिलेला धक्का लागल्याच्या कारणावरुन दाम्पत्याने एका तरुणाला मारहाण केली होती. मारहाणीत तोल जाऊन रेल्वे रुळांवर पडल्यानंतर वर येऊ शकण्याआधीच लोकल ट्रेनने तरुणाला धडक दिली आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेत मृत्युमुखी पडलेला दिनेश राठोड हा तरुण मूळ वाशिमचा असून आपल्या मुलाची हत्या झाल्याची उद्विग्न प्रतिक्रिया कुटुंबीयांनी दिली आहे. एकाही बघ्याने आमच्या मुलाला मदतीचा हात का नाही दिला? असा संतप्त सवाल राठोड कुटुंबीयांनी विचारला आहे. दिनेश देवराव राठोड (रा. किनखेड, ता. कारंजा लाड, जि. वाशिम) असं या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २६ वर्षीय तरुणाचं नाव आहे. तो मुंबईत बेस्ट बसचा वाहक म्हणून नोकरी करत होता. दिनेशच्या घरची परिस्थिती खूपच नाजूक आहे. कुटुंबाचा आर्थिक भार मुलावरच होता. दिनेश राठोड १३ ऑगस्टला नोकरीवरुन नवी मुंबईतील घणसोली येथे राहत असलेल्या घरी येत होता. सायन रेल्वे स्थानकावर घरी येण्यासाठी तो लोकल रेल्वेची वाट बघत होता. यावेळी काही जणांनी त्याचा मर्डर केला. सर्व प्रकार हा तिथल्या सीसीटीव्ही कॅमेरात रेकॉर्ड झालेला आहे. आरोपीला दादर रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. आम्हाला योग्य तो न्याय मिळावा अशी विनंती त्याच्या कुटुंबीयांनी केली आहे. प्लॅटफॉर्मवरील सहप्रवासी या घटनेचे मूक साक्षीदार होते. सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसून आले आहे की बघे जमा झाले, पण दिनेशला पकडण्याऐवजी आणि त्याला प्लॅटफॉर्मवर मागे खेचण्याऐवजी त्यांनी फक्त पाहणे पसंत केले असं दिनेशचा चुलत भाऊ सुरेश राठोड म्हणाला. शुक्रवारी सुरेशने काही नातेवाईकांसह दादर जीआरपी चौकीला भेट देऊन दिनेशच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. आम्हाला जाणून घ्यायचे आहे की हे जोडपे दिनेशसोबत इतके हिंसक का झाले? इतकाच आक्षेप होता, तर त्याला मारहाण करण्याऐवजी त्यांनी पोलिसांना बोलावले असते, असे एका नातेवाईकाने सांगितले. बेस्ट बस कंडक्टर असलेला दिनेश घणसोली येथे लहान भाऊ आणि बहिणीसोबत राहत होता. त्यांचे पालक वाशिम जिल्ह्यात राहतात. बेस्टने त्याला नुकतेच कायमस्वरूपी कर्मचारी बनवले होते. त्याचे कुटुंबीय त्याच्या लग्नासाठी स्थळ शोधत होते आणि पुढच्या वर्षी त्याने लग्न करावे अशी त्यांची इच्छा होती. त्याने एक कारही बुक केली होती, असे आणखी एका नातेवाईकाने सांगितले. दिनेशचे बहुतांश नातेवाईक मानखुर्द येथे राहतात. योगायोगाने आरोपी दाम्पत्य राहत असलेल्या ठिकाणापासून फार लांब नाही. दिनेशने आमच्यासोबत मानखुर्दमध्ये बराच वेळ घालवला. आमच्याकडे एक लहान बाळ आहे आणि दिनेशला बाळांसोबत खेळायला खूप आवडायचं. घटनेच्या दिवशी, १३ ऑगस्टला तो कामावर जाण्यापूर्वी बाळासोबत खेळायला सकाळी आमच्याकडे आला होता. ही त्याची शेवटची भेट असेल, अशी कल्पनाही कोणी केली नव्हती असं त्याचा चुलत भाऊ गणेश राठोड म्हणाला. दिनेशच्या मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर त्याचे पालक अस्वस्थ झाले आहेत. माहीम-माटुंगा पट्ट्यातील एका बस डेपोमध्ये दिनेश काम करत होता. १३ ऑगस्ट रोजी काम आटोपून घरी जाण्यासाठी ट्रेन पकडायला रात्री ९ वाजताच्या सुमारास तो सायन स्टेशनवर गेला होता. या दाम्पत्याशी झालेल्या भांडणाच्या तासाभरापूर्वी तो धाकट्या भावाशी फोनवरून बोलले होते. रात्री दहा वाजताच्या सुमारास त्याच्या कुटुंबीयांना पोलिसांकडून फोन आला. ट्रेनने धडक दिल्याने दिनेश गंभीर जखमी झाला आहे, असे त्यांना सांगण्यात आले. दिनेशच्या नातेवाईकांनी त्याच्या पालक आणि भावंडांसाठी रेल्वेकडून आर्थिक नुकसान भरपाई मागितली आहे. दिनेशवर १५ ऑगस्ट रोजी त्याच्या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या मागे आई, बहीण, दोन लहान भाऊ असा मोठा परिवार आहे. दिनेशचं बि ए पर्यंतचे शिक्षण झाले होते. अत्यंत मनमिळावू असलेल्या दिनेशची कोणतीही चूक नसतांना त्याला प्राणास मुकावे लागल्याने गावात हळहळ व्यक्त केली जातेय. दरम्यान या प्रकरणी दादर रेल्वे पोलिसांनी अविनाश माने व शीतल अविनाश माने यांना बेड्या ठोकल्या आहेत.

## पैसे नाही म्हणताच दारूड्याचे डोके ...

संध्याकाळपर्यंत धडपडत असतो. मोलमजुरी केली तरच संध्याकाळी घरची चुल पेटणार असते. त्यातच मोलमजुरी करणारे अनेकजण दारूच्या व्यसनाच्या आहरी गेलेले असतात. सकाळ पासून संध्याकाळपर्यंत अंगमोडून काबाड कष्ट करायचे आणि शीण घालविण्यासाठी म्हणून दारू प्यायची हे त्याचेच नित्याचेच झालेले होते. सांगली जवळील माधवनगरमधील राजगुरूनगर येथील झोपडपट्टीत सुनील श्रीरंग तरटे हे आपला मुलगा गणेश तरटे आणि पत्नीसोबत राहयला आहेत. सुनील हे सुरूवातीला मिळेल ते काम करून आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करीत होते. हल्ली त्याचे वय झाल्याने ते हलके काम करीत होते. त्याचा मुलगा गणेश हा हमालीचे काम करीत होता. ते राहत असलेल्या ठिकाणी विशाल देसाई हा तरूण ही राहयला आहे. तो ही गणेश बरोबर हमालीचे काम करीत होता. गणेश आणि विशाल हे दोघे ही चांगले जवळचे मित्र असल्याने दोघे ही दारूची पार्टी करायला आठवडयातून दोन तीन वेळा एकत्र येत होते. त्यातच आलिकडे विशाल याला दारू पिण्याचे जास्तच व्यसन लागलेले होते. तो सकाळ, दुपार संध्याकाळ दारू पिऊनच काम करीत होता. त्याला एखाद्यावेळेस दारू प्यायला मिळाली नाही तर त्याचे हात थरथरत होते. त्याला उतारा हा लागतच होता. हमाली कामातून मिळालेले पैसे तो दारूत खर्च करीत होता. त्यामुळे त्याच्या हातात पैसे काही शिल्लक राहत नव्हते. त्याची व गणेश याच्या घरची परिस्थीती अगदी बेताचीच होती. तरी ही ते दोघे दारू पिऊन गल्लीत दंगा मस्ती करीत होते. विशालने तर तरूण वयात दारू पिऊन आपल्या शरीराचे मातरे केलेले होते. तरी ही तो दारू पित होता. दारूसाठी पिण्यासाठी म्हणून तो हमालीचे काम करीत होता. कामातून जास्त पैसे मिळाले तर दोन दोन तीन तीन दिवस काम करीत नव्हता. एकदा त्याचेकडील पैसे संपले की तो लोकाच्याकडे मित्रांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागत फिरत होता. त्याची ही सवय अनेकांना माहित असल्याने त्याला बघून लोक टाळत होते. दारूच्या नशेत एखाद्याबरोबर मारामारी करणे, विनाकारण शिव्या घालणे हे प्रकार तो करीत होता. त्यामुळे त्याच्या नादाला कुणी लागत नव्हते. तो समोरून येताना दिसला की लोक आपली वाट बदलत होते. दारूडयाच्या नादाला कशाल लागयचे म्हणून ते त्याच्या समोर ही थांबत नव्हते. तरी ही विशाल हा रस्त्यात एखाद्याला अडवून त्याचेकडून पैसे काढून घेत होता. त्याची ही सवय बऱ्याचजणांना माहित असल्याने ते त्याला चुकवित होते. तरी ही तो ओळख असू दे अगर नसू दे दारूला पैसे मागण्यासाठी अनेकांना अडवून त्यांचेकडून पैसे मागत होता. त्यांनी पैसे दिले नाही तर तो जबरदस्तीने त्याच्या खिशात हात घालून पैसे काढून घेत होता. पैसे नाही सापडले तर त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून मारहाण ही करीत होता. त्याच्या या त्रासाला अनेकजण वैतागलेले होते. तो कायम खिशात चाकू ही ठेवत असल्याने लोक त्याला घाबरत ही होते. काही जण त्याला घाबरून पैसे देऊन निघून जात होते. शुक्रवार दि.११ ऑगस्ट रोजी सुनील तरटे हे रात्रीच्या वेळेस आपले काम आटोपून कर्नाळहून माधवनगरकडे चालत चालले होते. ते कंजारभाट वस्तीजवळ आल्याचे विशालने त्यांना बघितले. लांबूनच ते गणेशचे वडिल आहेत हे त्याने ओळखले होते. त्या दिवशी तो सकाळ पासून संध्याकाळपर्यंत त्याने फुल्ल दारू ढोसली होती. त्याच्या अगोदर ही दोन दिवस त्याने दारू फुल्ले पिलेली होती. तो दोन चार दिवस कामावर गेलेला नसल्याने दारूसाठी त्याचेकडे पैसे ही नव्हते. आता आयतेच मित्राचे वडिल येताना दिसल्याने त्याच्याकडे पैसे मागून दारू प्यायची असा त्याने बेत केला. सुनील तरटे हे जवळ आल्यावर विशालने त्याना अडवले. त्याने का अडवले? हे सुनील याच्या लक्षात आले.तो आता आपल्याकडे दारूसाठी पैसे मागणार हे त्यांनी ओळखले. ते जवळ येताच विशालने त्यांना काका मला ५० रूपये दया मी तुम्हाला उदया परत देतो असे म्हटले. त्यावर सुनील यांनी तुला कशासाठी पैसे पाहिजेत ते अगोदर मला सांग असे म्हटले. त्याच्या तोंडाचा अगोदरच घाण वास येत होता. त्याने त्यांना सरळच मला दारूसाठी पैसे पाहिजेत मला दया असे सांगितले. सुनील तरटे हे सरळ मार्गी आणि प्रामाणीक असल्याने त्यांनी त्याला तुला काम करायला नको, फक्त दारू पिऊन राहयला पाहिजे तु ही बिघडला आहेस आणि माझ्या मुलग्याला ही बिघडवले आहेस त्यामुळे मी काही तुला दारूसाठी पैसे देणार नाही असे स्षप्टच सांगितले. त्यांनी पैसे नाही म्हटले तरी तो त्याची वाट अडवून धरत होता. त्यामुळे सुनील यांना त्याचा फार राग आला. त्यांनी त्याच्या दोन कानाखाली लावून सर बाजुला, मला काम आहे आणि परत माझ्याकडे दारूसाठी पैसे मागायचे नाहीत असा सज्जड दम दिला. त्यांनी पैसे नाहीत म्हटल्यावर, विशालने त्यांना शिवीगाळ करायला सुरूवात करीत म्हाताऱ्या मला पैसे नाहीत म्हणतोस काय म्हणत त्यांना मारहाण करीत खाली पाडले. विशाल हा अगोदरच दारूच्या नशेत होता. तो त्याचेवर चिडला होता. कारण त्यांनी त्याला दोन कानाखाली लावले होते. याचा राग त्याला आला होता. तो त्यांना खाली पाडून लाथाबुक्यांनी तुडवत होता. सुनील हे ओरडत होते. कंजारभाट वस्तीजवळ रात्रीच्या वेळेस फारसी गर्दी नव्हती. एक दोन वाहने जात होती. त्यामुळे त्याच्याकडे फारसे कुणाचे लक्ष गेले नाही. याचाच फायदा घेत विशाल दात ओठ खात त्यांना मारहाण करीत होता. त्यातच त्याचा सयंम सुटला आणि त्याने बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि सुनील याच्या डोक्यात जोरात हाणला. त्याने त्याच्या डोक्यात जोरात दगड घातल्याने त्याचे डोके जागीच फुटले होते. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर विशाल हा तेथून पळून गेला. बऱ्याचवेळानंतर रात्रीच्या अंधारता कुणी तरी रक्तच्या थारोळ्यात पडल्याचे जाणाऱ्या येणाऱ्याच्या लक्षात आल्यावर तेथे गर्दी जमली. काही जणांनी त्यांना ओळखले होते. राजगुरू नगर झोपडपट्टीतील ती व्यक्ती असल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर एकाने या घटनेची माहिती राजगुरू झोपडपट्टीत दिली. लोक धावत पळत घटनास्थळी आल्यावर त्यांना मयत व्यक्ती ओळखली. या गर्दीत मयत व्यक्तीचा मुलगा गणेश हा असल्याने त्याने आपल्या वडिलांना ओळखले. त्याचा कुणी तरी खून केला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याने या घटनेची माहिती सांगली ग्रामीण पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रक्ताच्या थारोळ्यात वयोवृध्द व्यक्ती पडली होती. त्याच्या बाजुलाच एक बाजाराची पिशवी आणि रक्ताने माखलेला दगड पडला होता. त्याचे डोके दगडाने ठेचलले असल्याने मोठी जखम होऊन रक्तस्त्राव झालेला होता. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत सुनील तरटे यांचा मुलगा गणेश तरटे याच्याकडून घेतली.त्याने पोलीसंना सांगितले की, त्याचे वडिल सकाळी कर्नाळ येथे गंवडी कामासाठी गेले होते.संध्याकाळी घरी परतत असताना त्याचा कु णी तरी अज्ञात कारणाने खून केला आहे. पोलीसानी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सांगली येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याना माहिती मिळाली की ते ज्यावेळी रस्त्यावरून जात होते. त्यावेळी त्याचे एका दारूडया तरूणाबरोबर भांडण चालले होते. यावरून पोलीसांनी आजुबाजुचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता त्याना त्यात विशाल देसाई नावाचा तरूण मारहाण करीत असल्याचे दिसले. पोलीस त्याचा शोध घेत असताना घटनेनंतर तो तब्बल दहा तासांनी त्याच्या घरी राजगुरू नगर झोपडपट्टीत असणाऱ्या घरी नशेत सापडला. पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलीसाची दिशाभूल करीत होता. अखेर पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून सुनील यांनी दारूसाठी पैसे दिले नसल्याने आणि त्यांनी आपल्याला दोन कानाखाली मारल्याने रागाच्या भरात आपणच त्याचा खून केला अशी माहिती दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची लेखी फिर्याद मयत सुनील तरटे यांचा मुलगा गणेश तरटे (वय २५) याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी सुनील श्रीरंग तरटे (वय ६५) याच्या खून प्रकरणी विशाल अनिल देसाई (वय २३) याच्या विरोधात सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला शनिवार दि.१२ रोजी न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला दगड जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पो.निरी शिवाजी गायकवाड याच्या मार्गदर्शनाखाली स.पो नी.सुशांत पाटील हे करीत आहेत.

## पावरा आणि खर्डे कुटुंबात शेतातच...

त्याच जागेवर बादाची ठिणगी पडली आणि यामध्ये दोघांना जीव गमवावा लागला. मलगाव शिवारातील पिंपळपाड्या गावातील शेतजमिनीवर आमचा हक्क असल्याचे खर्डे आणि पावरा कुटुंबीय सांगत आलेले आहेत. हे दोन्ही कुटुंबीय एकाच परिवाराचे सदस्य आहेत. ज्या शेतजमिनीबद्दल त्यांचा वाद चालू आहे, ती शेतजमीन अविनाश सुकराम खर्डे कुटुंबीयांच्या ताब्यात असल्याने सुकराम कळजी खडे, अविनाश सुकराम खडे, रायसिंग कळजी खर्डे, ममता सुकराम खर्डे, शकुंतला रायसिंग खर्डे, देविदास रायसिंग खर्डे, निलेश रायसिंग खर्डे, जगदीश रायसिंग खड़े हे आपल्या शेतात मशागत करत होते, तर त्या जमिनीवर आपला हक्क सांगत सुनिल राजेंद्र पावरा, गणेश दिवाण खर्डे, सोनीबाई गणेश खर्डे, अरूण राजेंद्र पावरा आणि रमीबाई दिवाण खर्डे हे निंदणीचे काम करत होते. एकच जमीन त्यावर हक्क सांगत दोन कुटूंबे आल्याने खदखदणाऱ्या वादाचा भडका उडणार यात शंकाच नव्हती. सुकराम कळजी खर्डे, अविनाश सुकराम खर्डे, रायसिंग कळजी खर्डे, ममता सुकराम खर्डे, शंकुलताल रायसिंग खर्डे, देविदास रायसिंग खर्डे, निलेश रायसिंग खर्डे हे लोखंडी सळ्या, लाकडी दांडके, लाठ्या-काठ्या घेवून चाल करून गेले. यावेळी सुनिल राजेंद्र पावरा यांच्यासह अन्य लोक त्या शेतात निंदणीचे काम करत होते. 'हे शेत आमच्या मालकीचे आहे. तुम्ही या शेतात का बरं निंदणी करताय?' असा सवाल जमावाने सुनिल पावरा आदींना केला. त्यावर 'हे शेत आमचे आहे. ते शेत आमच्या ताब्यात आहे. त्या शेताची मशागत करण्याचा हक्क आमचा आहे. तुम्ही कोण आम्हाला विचारणारे' असे म्हणत सुनिल पावरा यांनी सुकराम पावरा यांना प्रश्न केला. आरोप-प्रत्यारोपांचा हा वाद शब्दा-शब्दावरून वाढत गेला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. सुनिल पावरा आदींनी तलवार, विटा, लाकडी दांडक्याचा वापर करत सुकराम खर्डे, तुकाराम खर्डे, अविनाश खर्डे, रायसिंग खर्डे, ममता खर्डे, शकुंतला खर्डे, देविदास खर्डे, निलेश खर्डे आणि जगदीश खर्डे आदीवर चाल करत प्राणघातक हल्ला केला. सुनिल पावरा आणि कुटुंबीय पूर्णतः बेसावध असतांना प्राणघातक हल्ला केल्याने ते लोकही चवताळले. जीवावर उदार होवून त्यांनी गावठी पिस्तूल सह विविध आयुधांचा वापर करत त्यांनीही सुकराम खडे आदींवर प्राणघातक हल्ला केला. पावरा आणि खर्डे परिवारातील ही धुमश्चक्री खूपच वेळ चालली दोन्ही परिवार इरेस पेटून उठले होते. एक घाव आणि दोन तुकडे करून वादातीत प्रश्न कायमचाच निकाली काढायचा असा जणू दोन्ही परिवाराने चंग बांधला असावा. या धुमश्चक्रीत सुनिल पावरा याने आपल्याजवळील गावठी कट्ट्यातून फायरींग करून अविनाश खर्डे याच्या छातीवर सरळ गोळी झाडली. गावठी कट्ट्यातून सुटलेल्या गोळीने त्याच्या छातीचा वेध घेतला. गावठी पिस्तुलातून सुटलेल्या गोळीने अविनाशचा बळी घेतला. अविनाश रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर पडला. सुनिल पावरा एवढ्यावरच थांबला नाही. त्याने देविसिंग खर्डे याचा काका सुकराम खर्डे यांच्या छातीवरसुद्धा गोळी झाडली, त्यामध्ये सुकराम गंभीर जखमी झाला. दरम्यान या घटनेचा सुगावा लागताच शहादा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजी बुधवंत हे फौजफाट्यासह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी गोळीबारात गतप्राण झालेल्या अविनाश सुकराम खर्डे याचा मृतदेह आणि गंभीर अवस्थेत जखमी झालेल्या सुकराम कळजी खर्डे याला तात्काळ उपचारार्थ शहादा येथील शासकीय रुग्णालयात पाठवले. उपचार घेत असताना सुकराम खर्डे याचीही प्राणज्योत मालवली. गावठी पिस्तुलातील गोळीने बाप-लेकाचा बळी घेतल्याने मलगाव शिवारात दहशतीचे वातावरण पसरले. दरम्यान अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे आणि उपविभागीय पोलीस अधिका-यांनीही घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांना या गंभीर घटनेची माहिती मिळताच त्यांनी मलगाव शिवारात पोलिसांची अधिक कुमक पाठवली. या एकाच घटनेच्या संदर्भात शहादा पोलीस स्टेशनला दोन फिर्यादी दाखल झाल्या. देविसिंग रायसिंग खर्डे याने सुनिल राजेंद्र पावरा, गणेश दिवाण खर्डे, सोनीबाई गणेश खर्डे, अरुण राजेंद्र पावरा, ललिताबाई राजेंद्र पावरा आणि रमीबाई दिवाण खर्डे या सहा जणाविरुद्ध प्राणघातक हल्ल्याची फिर्याद दाखल केली. गावठी पिस्तुलाचा वापर करत गोळीबार केल्याने अविनाश मुकाम खर्डे आणि त्याचा बाप सुकराम कळजी खर्डे दोघे मृत पावल्याने या फिर्यादीच्या आधारे शहादा पोलिसांनी उपरोक्त संशयिताविरुद्ध भा. दं. वि. ३०२ नुसार गुन्हा दाखल केला. त्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पाटील करत आहेत. दुसरी फिर्याद मोनीबाई गणेश खर्डे या महिलेने दाखल केली. सुकराम कळजी खर्डे, अविनाश सुकराम खर्डे, रायसिंग कळजी खर्डे, ममता सुकराम खर्डे, शकुंतला रायसिंग खर्डे, देविदास रायसिंग खर्डे, निलेश रायसिंग खर्डे, जगदीश रायसिंग खर्डे मलगावातील हल्लेखोरांनी शेतावर बेकायदेशीर प्रवेश करून हल्ला केल्याचे फिर्यादीत नमुद केल्याने शहादा पोलिसांनी उपरोक्त संशयितांविरुद्ध भा.दं.वि.३०७ अन्वये गुन्हा दाखल केला फिर्यादीनुसार दाखल गुन्ह्याचा तपास करण्याची जबाबदारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतापसिंह मोहिते यांच्यावर सोपवण्यात आली.

## सुडाची बाधा त्यांच्या प्रेमाला ...

दिली असता धानवापाडा येथील एका घरात एक महिला मृतावस्थेत आढळून आली. धानवापाडा येथे राहणाऱ्या अशोक सदाशिव मराडे (वय ३९) याने त्याची पत्नी अश्विनी मराडे (वय ३२) हिचा गळा आवळून जीवे ठार मारले असल्याचे निष्पन्न झाले आहे. अशोक हा आपल्या बायकोवर नेहमीच संशय घेऊन मारहान करत होता, ही हत्याही त्यानेच केली असल्याची तक्रार मयत अश्विनीचे वडील चिंतामण कृष्णा धिंडा यांनी केली आहे. भा.दं.वि.सं. कलम ३०२ नुसार गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याची माहिती मिळताच जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालघर उपविभागीय पोलीस अधिकारी निता पाडवी यांनी घटनस्थळी भेट दिली तर पोलीस निरीक्षक सुरेश कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास खरमाटे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके, हवालदार गुरुनाथ गोतारने, अंमलदार चेतन सोनावणे यांनी कारवाई केली.

21 TO 27 AUGUST 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:48 PM Page 1



# संगणक परिचालकाच्या आत्महत्या प्रकरणी दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करण्याची मागणी




**देवणी/प्रतीनिधी**

ग्रामपंचायत हिप्परगाथडी ता. बिलोली जि. नांदेड येथील अंबादास नागोराव पेटेकर यांनी csc -spv कंपनीने नाहक दिलेले टार्गेट, ग्राम पंचायत कामा व्यतिरिक्त लावण्यात येणारे इत्तर कामे, तसेच ग्रामपंचायत स्तरावर कामावरुन कमी करण्याच्या दिलेल्या धमक्या, राज्य शासन संगणकपरिचालकांचा निर्णय घेण्यास करत असलेली टाळाटाळ या सर्व प्रकारामुळे होणारा मानसिक त्रास व दबावामुळे ०९ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री १०.००च्या सुमारास हिप्परगाथडी गावच्या ग्रामपंचायत कार्यालयात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी तसेच आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून त्यांना त्वरित अटक करावे या मागणीसाठी देवणी पंचायत समिती येथे निवेदन देऊन दोषींवर लवकरात लवकर कार्यवाही करुण त्यांच्यावर गुन्हे दाखल करुण त्यांना त्वरीत अटक करा या आशयाचे निवेदन सोमवारी १४ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता काळ्या फिती लावून महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटना देवणीच्या वतीने सर्व संगणकपरिचालक निदर्शने करण्यात आले. यावेळी संगणक परिचालक संघटनेचे देवणी तालुका अध्यक्ष माधव कोरे,चंद्रकांत बिरादार, नवनाथ स्वामी बोळेगावकर, रणजित घाटगे, दत्ता काकनाळे, राजकुमार देशमुख, इलाही अत्तार, रेवण बडूरे, प्रशांत भोपनीकर, अभिषेक कांबळे, श्रीनिवास बिरादार, सोमनाथ स्वामी, द्राक्षणी पाटील, राजेश्वरी श्रंगारे, नसीमा शेख, मोशिन पठाण, गौतम सोमवंशी, नितीन कांबळे, खलील हाश्मी, कृष्णा पांचाळ, यांच्यासह तालुक्यातील संगणक परीचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिवंडीत टोइंगव्हॅन चालकावर नागरिकाने उगारला दगड

# पार्किंग झोन नसल्याने नो पार्किंगच्या कारवाईने नागरीक संतप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरात कोठे ही पार्किग झोन नसल्याने नो पार्किगचे कारण पुढे करीत वाहतूक विभागाची टोइंग व्हॅन रस्त्यात उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करीत असते. परंतु या टोईंग व्हॅन कडून अनेक वेळा मनमानी पद्धतीने कारवाई करीत असल्याने त्रस्त वाहन चालकाने टॉइंग व्हॅन चालकावर दगड उगारून मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना भिवंडी शहरातील कल्याण रोड परिसरात घडली आहे.

या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात तक्रार करण्यात आली आहे. भिवंडी शहरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली असून वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना वाहतूक पोलीस प्रशासन हतबल झाले आहे. त्यातच शहरात वाहन पार्किगची व्यवस्था नसल्याने नागरिकांना आपली वाहने रस्त्यावरच पार्क करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडते. तर दुसरीकडे रस्त्यावर पार्क केलेली वाहने टोईंग व्हॅन वाले उचलून नेत असल्याने नागरिकांना आर्थिक व मानसिक भुर्दड सहन करावा लागत आहे. किमान बँक, दवाखाना, रुग्णालय अशा महत्वाच्या ठिकाणी तरी कारवाई करू नये अशी माफक अपेक्षा नागरिकांची आहे. दरम्यान या घटनेचा नागरिकांनी काढलेला व्हिडिओ व्हायरल झाल्याने ही घटना समोर आली आहे. यासंदर्भात दगड उचलणाऱ्या इसमा विरोधात शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली असून पोलिस अज्ञात नागरिकाचा शोध घेऊन कारवाई करतील माहिती भिवंडी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनीष पाटील यांनी दिली आहे.

## सोलापूर जिल्हा परिषदेचे दोन कर्मचारी निलंबित

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये कामात अनियमितता, दप्तर दिरंगाईचा ठपका ठेवत जलजीवन मिशन विभागात कार्यरत असणाऱ्या दोन निविदा लिपिकांवर सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. अनिल पाटील व श्यामसुंदर समदूरले अशी निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. जलजीवन मिशनचे तत्कालीन कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांची सध्या विभागीय चौकशी सुरू आहे. दीपक कोळी यांच्या कार्यकाळापासून आजपर्यंत पाटील व समदूरले हे दोघे निविदा लिपिक म्हणून कार्यरत होते. जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.समाधान आवताडे यांनी केली होती. तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी हे प्रशिक्षणासाठी मसूरीला गेले असताना त्यांच्याकडील मुख्यकार्यकारी अधिकारी पदाचा प्रभारी पदभार विद्यमान मुख्यकार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्याकडे सोपविण्यात आला होता. त्यावेळीही मनीषा आव्हाळे यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या जलजीवन मिशनचे अंतर्गत कामांना व निविदा प्रक्रियेला नियोजनबद्ध शिस्त लावण्याचा प्रयत्न केला होता. या कारवाईमुळे जिल्हा परिषदेत खळबळ उडालेली आहे.

# राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत मुलींमध्ये नाशिक तर मुलांमध्ये पुणे विभागाने पटकाविले सुब्रतो चषक!




**जळगाव/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलावर सुरू असलेल्या राज्यस्तरीय आंतरशालेय सुब्रतो चषक फुटबॉल स्पर्धेत मुलींमध्ये नाशिक विभागाने मुंबईचा ६–० तर मुलांमध्ये पुणे विभागाने मुंबईचा ५–३ ने(पेनल्टी) पराभव करीत सुब्रातो चषक पटकाविला. विजयी व उपवीजयी संघांना पोलीस अधीक्षक एस राजकुमार, जिल्हा नियोजन अधिकारी प्रतापराव पाटील, यांचे हस्ते चषक व पदक देण्यात आले यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी गुरुदत्त चव्हाण, फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष सचिव फारुक शेख, सहा नियोजन अधिकारी राहुल इदे, प्रा.डॉअस्मिता पाटील, प्रा.डॉ. अनिता कोल्हे, अडव्होकेट आमिर शेख,अब्दुल मोहसीन यांच्या उपस्थितीत पारितोषिक देण्यात आली. वंशिका माटे, नागपूर, सोडियम ब्रू, पुणे, जहान मिस्त्री, मुंबई, चींखाई लांबा, कोल्हापूर व अरहम अगरवाल यांना देण्यात आली. या स्पर्धेतील विजयी उपविजय संघातील खेळाडूंना वैयक्तिक सुवर्ण व रजत पदक सहित चषक तसेच प्रत्येक स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूला पदक व ट्रॉफी जैन स्पोर्ट्स ॲकॅडमी, गोदावरी फाउंडेशन, पींचं बॉटलिंग व स्पोर्ट्स हाऊस जळगाव तर्फे देण्यात आली. स्पर्धा यशस्वीतेसाठी फारुक शेख यांच्या नेतृत्वात अब्दुल मोहसीन यांच्या मार्गदर्शनाखाली अरबाज खान, अर्जुन सनस, आकाश पाल वसीम शेख, पंकज तिवारी, राहील अहमद, आकाश कांबळे, सुरज सपके, कौशल पवार, धनंजय धनगर, अरशद शेख, कुलदीप पाटील, आशुतोष शुक्ला दीपक सस्ते, अयान शेख, संजय कासेकर व नीरज पाटील यांनी पंच म्हणून कामगिरी पार पडली.

## अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची होणार आरोग्य तपासणी!

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागामार्फत डॉ. आनंदीबाई जोशी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला महिला व बालविकास मंत्री कु.अदिती तटकरे उपस्थित राहणार आहेत. आजादी का अमृत महोत्सव व रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे. राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची वैद्यकीय तपासणी दि. १५/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३ दरम्यान वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर मार्फत करण्यासाठी महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी निर्देश दिले आहेत. तसेच ज्या जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय उपलब्ध नाहीत. अशा ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सालय ग्रामीण विभाग यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. असे निर्देश देण्यात आले आहेत. अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रविण भावसार यांच्या मार्फत देण्यात आली आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण!



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा परिषदेत देशाच्या ७६वा स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सोलापूर जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात जिल्हा परिषदेचा शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्यकार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्यकार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी अमोल जाधव, मुख्य वित्त व लेखा अधिकारी उत्तम सुर्वे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता खराडे, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, उपमुख्यकार्यकारी अधिकारी मिरकले, जिल्हा कृषी अधिकारी वाघमोडे, शिक्षणाधिकारी मारुती फडके, शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, उपशिक्षणाधिकारी संजय जाविर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले, पशुसंवर्धन अधिकारी नवनाथ नरळे, समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, लेखाधिकारी पाटील, जिल्हा प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांचे पुजन मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर केले. देशभक्तीपर पर घोषणा यावेळी देण्यात आल्या. मुलांनी देशभक्तीपर गीते सादर केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी सर्व महिला कर्मचारी व पुरूष कर्मचारी यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी सोलापूर ग्रामीण व सोलापूरकरांना शुभेच्छा देताना तंबाखू मुक्तीसह जिल्हा परिषदेमध्ये प्लास्टिक मुक्तीचा संकल्प केला. या प्रसंगी सर्व महिला व पुरूष कर्मचारी यांची जागेवर जाऊन भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांचे हस्ते लहान मुलांना मिठाईचे वाटप करणेत आले.

दरम्यान प्लास्टिक च्या वापरामुळे पर्यावरणाची खुप मोठी हानी होत आहे. प्लास्टिक चा वापर टाळा. असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केले. प्लास्टीक मुक्तीचा गावोगावी संकल्प करा. जिल्हा परिषदेत पिण्यासाठी स्टील किंवा काचेचे बाटलीचा वापर करा असे आवाहन मनिषा आव्हाळे यांनी केले.

# अनुभूती स्कूलच्या विद्यार्थ्यांचे जपान येथे सादरीकरण



**जळगाव/प्रतिनिधी**

जपानमध्ये वाकायामा येथे आशियाई आणि ओशनियन हायस्कूल विद्यार्थी मंचच्या वतीने आयोजित केलेल्या 'शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण परिषद' मध्ये भारताच्यावतीने एकमेव शाळा, अनुभूती रेसिडेन्शिअल स्कुल, जळगावचा विद्यार्थी, अतिशय जैन याने आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करीत भारतातील जल समस्या आणि त्यावरील उपाययोजना या विषयावर संशोधन सादर केले. या परिषदेत विविध २२ देशांतील शाळांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यांत विद्यार्थी प्रतिनिधींद्वारे जागतिक पातळीवर होणारे बदल आणि त्याचा त्यांच्या देशातील वातावरण, भौगोलिक, पर्यावरण, शिक्षण इ घटकांवर होणारे परिणाम आणि त्यावर करता येऊ शकणाऱ्या उपाय योजनांवर संशोधन सादर केली जातात. या परिषदेमध्ये अनुभूती स्कूलचा विद्यार्थी अतिशय जैन, शिक्षक स्वागत रथ यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. भारताचे महावाणिज्य दूत निखिलेश गिरी, जपान वाकायामाचे गव्हर्नर किशीतमोटो शुहेई यांनी हा गौरव केला. या आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या परिषदेत २०१४ पासून दरवर्षी अनुभूती रेसिडेन्शिअल स्कुल भारताचे प्रतिनिधित्व करीत असून आतापर्यंत अनुभूती रेसिडेन्शिअल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, अन्न–सुरक्षा, त्सुनामी अशा विविध पर्यावरण आणि मानवी विकास समस्यांवरील विषयांचे सादरीकरण केले आहे. या अत्यंत महत्वाच्या जागतिक पातळीवरील परिषदेत सहभागी होण्यासाठी अनुभूती स्कुलचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा अनिल जैन यांचे अनमोल सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. शाळेच्या वतीने या दौऱ्यासाठी वाणिज्य शिक्षक स्वागत रथ यांची विद्यार्थी प्रतिनिधी अतिशय जैन याला मार्गदर्शक सोबती म्हणून निवड केली होती.


वकील : ॲड.मोहन सुर्यवंशी

**जाहीर नोटीस**

**वसई येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

चौकशी अर्ज क्र. : १६७९/२०२३
पु.ता. ३०/०९/२०२३

**पांगा नवसु भुयाल** .... **अर्जदार**

**विरुद्ध**

**उपनिबंधक, जन्म–मृत्यू नोंदणी**
**वसई–विरार शहर महानगरपालिका**
**विभाग वसई** .... **सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदार **पांगा नवसु भुयाल** यांनी त्यांची आई **कै. काळुबाई नवसु भुयाल** यांचा मृत्यू दिनांक १३/११/२०१४ रोजी झाला आहे आणि ज्याअर्थी वरील मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश मिळणेकरीता या न्यायालयात चौकशी अर्ज क्रमांक १६७९/२०२३ दिनांक ०९/०८/२०२३ रोजी दाखल केला आहे. त्याकामी ज्याकोणी इसमांची हरकत असेल तर त्यांनी या न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत नोंदवावी. सदरहू आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमांची मुदतीत हरकत दाखल न झाल्यास योग्य ते पुरावे कागदपत्र घेऊन अर्जदाराला त्यांनी इकडील न्यायालयात दाखल केलेल्या चौकशी अर्जाप्रमाणे नोंद करण्याबाबत आदेश देण्यात येईल, ह्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक १८/०८/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/–**
**क.लिपीक**

**कोर्टाचा शिक्क**

**सही/–**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, वसई**


## पांगरी पोलिसांनी टेम्पो लूटप्रकरणी चोरट्याना केले जेरबंद



**सोलापूर/प्रतिनिधी**

धारदार शस्त्राचा धाक दाखवून टेम्पो चालकास अडवून गुळाचे बॉक्स लुटून नेल्याच्या प्रकरणात छडा पांगरी पोलिसांनी लावला व पाठलाग करून दुचाकी व इतर मुद्देमालांसह एकास अटक केली आहे. सुदर्शन राजेंद्र डोंगरे (२२) असे मुद्देमालासह पकडलेल्या चोरट्याचे नाव आहे. अकबर पठाण या टेम्पो चालकाने पांगरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. बार्शी–लातूर राष्ट्रीय महामार्गावरील धारी ते पांगरी दरम्यान सोमवारी पहाटेच्या सुमारास लुटीचा प्रकार घडला होता. अन्य एका घटनेत याच दरोडेखोरांनी हद्दीतील एका हॉटेलवरील मोबाईल असा एकूण तीस हजारांचा ऐवज जबरदस्तीने लुटून नेला होता. बार्शी ते लातूर रोडवरील घारी गावच्या पुढे काही अंतरावर खड्ड्यामुळे वेग कमी केल्यावर मोटरसायकल वरील तिघांनी चालक पठाण यांना गाडीतून उतरवून चाकूचा धाक दाखवून गाडीतील गुळाच्या ढेपीचे बॉक्स काढून घेतले होते. पांगरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे, जाधव, लोकरे, घुगे, कोळी यांनी तातडीने स्थानिक लोकांच्या मदतीने तसेच गोपनीय बातमीदारामार्फत माहिती घेऊन चोरटे हे येडशी रोडच्या दिशेने मोटरसायकलवर गेल्याचे समजल्याने तात्काळ पोलीस पथक त्या दिशेने रवाना केले असता येडशी येरमाळा हायवे रोडने एक मोटरसायकलवर तीन संशयित भरधाव वेगात जात होते त्यांच्या संशयाने त्यांचा सुमारे पाच किमी पाठलाग करून त्यांचेतील एका इसमास पकडले त्याने इतर साथीदारांसह गुन्हा केल्याचे सांगितले. ही सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे यांच्या पथकाने केली आहे.

## भारतीय स्वतंत्र दिनी रोटरी क्लब उदगीरतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी गट साधन केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनानिमित्त गटसाधन केंद्र देवणी येथे रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलतर्फे देवणी गटातील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या सर्व प्रवर्गाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य स्कूल बॅग वाटर बॉटल लंच बॉक्स कंपास पेटी आणि ड्रॉइंग बुक इत्यादी वाटप करण्यात आले यावेळी गटशिक्षणाधिकारी शिंदाळकर एस.पी,शिक्षण विस्तार अधिकारी रोडगे एस.यू, गटसमन्वयक साबणे एस.बी, अलमखाने, तसेच सर्व विषय साधन व्यक्ती, समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत कार्यरत विशेषतज्ञ, विशेष शिक्षक आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात देवणी गटातील ३५ लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.पी.जाधव यांनी केले व अध्यक्षीय समारोप शिंदाळकर एस.पी साहेब यांनी केले आभार रोडगे एस. यू यांनी मानले.

21 TO 27 AUGUST 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:49 PM Page 1



# मेंढरांची अंधभक्ती!

विज्ञान युगात प्रत्येक माणूस डोळसपणाने वागत असतो. एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्या गोष्टीच्या दोन्ही बाजू तपासून घेत असतो. अगदी एखादी वस्तू खरेदी करताना सुद्धा ती वस्तू व्यवस्थित पारखून घेतल्याशिवाय माणूस खरेदी करत नाही. माणसाची हीच वृत्ती राजकीय पक्ष आणि त्या पक्षातील भ्रष्ट नेते यांच्याबाबत मात्र उदासीन असते. एखाद्या पक्षाच्या मागे फरपट जाण्यापूर्वी त्या पक्षाची ध्येय धोरणे, त्या पक्षाची जनमानसातील विश्वासार्हता आणि समाजासाठी त्या पक्षाने केलेले काम या सगळ्या गोष्टी खरे तर तपासून घ्यायला हव्यात. पण आजकाल लोक एखाद्या पक्षावर किंवा त्या पक्षातील नेत्यावर डोळे झाकून विश्वास ठेवतात आणि त्याच्या मागे फरफटत जातात. त्यामुळे तो नेता आणि त्याचा पक्ष आपल्या मतदारसंघातील लोकांना जमेत धरून चालत असतो. आपण काहीही जरी केलं तरी सुद्धा लोक आपल्या मागे येतात, त्यामुळे लोकांचा विचार करण्याची काहीही आवश्यकता नाही अशी त्याची धारणा झालेली असते. आज राजकारणात जे काही सुरू आहे ते जनतेच्या अंधभक्तीचे प्रतीक आहे. एखादा पुढारी भ्रष्टाचाराच्या आरोपात तुरुंगात गेला तर त्याच्याविषयी लोकांच्या मनात पूर्वीची भावना असता नये. आपण ज्याला आपला नेता मानतोय त्याने काहीतरी चुकीचा केलेल आहे म्हणूनच तो तुरुंगात गेला. अशा वेळेला आपण त्याच्या मागे फरफटत जाणे म्हणजे त्याची गुलामी करण्यासारखी आहे. एवढं तरी माणसाला कळायला हवं. आज राजकारणात असे लाखो अंधभक्त गुलाम भ्रष्ट नेत्यांच्या मागे फरफटत जात आहेत. त्यामुळेच तो नेता बेछूट बनत चालला आहे. त्याला ना कायद्याची भीती ऊरली, ना जनतेची चिंता! जोवर लोक आपल्या मागे आहेत, तोवर कुणीही आपलं काहीही करू शकत नाही, अशी एक धारणा राजकीय पुढाऱ्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. म्हणून ते बिंदास आहेत. पण लोकशाहीसाठी हे घातक आहे. ज्याला लोकप्रतिनिधी म्हणून आपण निवडून देत आहोत. त्याच्याकडून आपल्या काहीतरी अपेक्षा आहेत. आणि त्या अपेक्षा जर तो पूर्ण करणार नसेल तर त्याला परत बोलण्याचा अधिकार आपल्याला असायला हवा. राईट टू कॉलच्या माध्यमातून असा आवाज उठवण्यात आला होता. पण त्याचे पुढे काय झाले कुणास ठाऊक? कारण पक्षांतर बंदी विरोधी कायदा अधिक कठोर करणे सर्वच राजकीय पक्षांसाठी गैरसोयीचे आहे. आणि म्हणूनच राईट टू कॉलला कुठल्याही राजकीय पक्षांनी पाठिंबा दिलेला नव्हता. कारण राईट टू कॉल सारखे कायदे अस्तित्वात आले, तर राजकीय पुढाऱ्यांची महत्त्वकांक्षा आहे ती त्यांना पूर्ण करता येणार नाही. कारण एकाच पक्षात राहून काहीही साध्य होत नाही. त्यामुळे विरोधी पक्षात असलेल्या माणसाला सत्तेची आस असते. कारण सत्तेत गेल्यावर अधिकार प्राप्त होतात आणि त्या अधिकाराच्या माध्यमातून त्याने ज्या चुकीच्या गोष्टी केलेले आहेत, त्यातून जे नुकसान होणार आहे ते थांबवता येते. आणि म्हणूनच पक्षांतर बंदी कायद्यात दोन तृतीयांशची मर्यादा आहे ती कायम राहावी, असे सर्वच राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधींना वाटते. गेल्या वर्षभरात दोन मोठे पक्ष फुटले आणि त्यातून एक नवे सरकार अस्तित्वात आले. वास्तविक ज्या दोन पक्षातले लोक फुटले त्यातील बऱ्याच लोकांवर आर्थिक भ्रष्टाचाराचे गुन्हे आहेत. केवळ सत्तेच्या सावलीत राहून गुन्हे मुक्त होण्यासाठी आणि भ्रष्ट मार्गाने कमावलेली आपली बेनामी संपत्ती वाचवण्यासाठीच या लोकांनी पक्षांतर केलेले आहे. त्यामुळे असे लोक मतदारांचे गुन्हेगार आहेत. वास्तविक मतदारांनी याबाबत आवाज उठवायला हवा होता. पण कुणीही आवाज उठवलेला नाही जणू काही या प्रकरणाशी आपले काहीच घेणेदेणे नाही अशा अविर्भावातच जनता उघड्या डोळ्यांनी हे सर्व पहात आहे. याचे मुख्य कारण जनतेमध्ये मोठ्या संख्येने अंध फक्त आहेत जे स्वतःला कार्यकर्ते म्हणून घेतात आणि अशा लोकांसाठी त्यांचा भ्रष्ट नेता हा एक प्रकारे देवदूतच असतो. त्यामुळे त्याने काहीही केले तरी या अंधभक्तांना त्याचे वाईट वाटत नाही. दुर्दैवाने अशाच अंधभक्तांमुळे या देशातील लोकशाही धोक्यात आलेली आहे. निवडणूक केवळ नावापुरती राहिलेली आहे. त्याचबरोबर निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधींना यापुढे कसलेही बंधन नाही. कारण त्यांच्या विरोधात आवाज उठवण्याची कोणाची हिंमतच नाही, जो कोणी आवाज उठवेल त्याचा आवाज बंद करण्याचे काम त्या पुढाऱ्याचे अंधभक्त इमाने इतबारे करीत असतात. दोन वर्षापूर्वी महाराष्ट्रातला एक नेता भ्रष्टाचाराच्या प्रकरणात दोन वर्ष तुरुंगात राहून जामिनावर सुटून आला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या नेत्याची त्याच्या अंधभक्त कार्यकर्त्यांनी अक्षरशः मिरवणूक काढली. हा प्रकार अत्यंत वेदनादायी होता. आताही शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षातून फुटलेल्यांचे अभिनंदनाचे बॅनर नाक्या नाक्यावर झळकत आहेत जणू काही त्यांनी देशासाठी फार मोठे कार्य केलेले आहे. जर हे प्रकार भविष्यात असेच चालू राहिले तर या देशातून लोकशाही संपलेली असेल. जे लबाड आहेत जे भ्रष्टाचारी आहेत ज्यांच्याकडे मनी आणि मसल पावर आहे असेच लोक सत्तेत राहतील आणि जे प्रामाणिक आहेत त्यांना देशासाठी काही तरी करायचं आहे अशा लोकांना मात्र सत्तेच्या राजकारणापासून पद्धतशीरपणे दूर ठेवले जाईल. अंधभक्तीचे दुष्परिणाम किती भयंकर असू शकतात हे भविष्यात निश्चितपणे बघायला मिळेल. त्यासाठी २०२४ ची लोकसभेची आणि विधानसभेची निवडणूक सुद्धा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या वर्षाच्या अखेरीस पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका आहेत. या निवडणुकीमध्ये अर्थातच ज्यांच्याकडे पैसा आहे आणि पैशाच्या जोरावर निवडून येण्याची क्षमता आहे अशाच लोकांना तिकिटे मिळतील आणि अंधभक्तांच्या जोरावर हे लोक निवडून येतील पुढे पाच वर्ष काहीही करायला ते मोकळे असतील. अंधभक्तांना त्यांच्याकडून केवळ चिरीमिरी दिली जाईल. मात्र याच चिरीमिरीसाठी त्यांनी आपले इमान विकून या देशाचे आणि देशातील लोकशाहीचे फार मोठे नुकसान केलेले असेल. जोवर या देशात अंधभक्त आहेत तोवर या देशातील भ्रष्ट राजकारण्याला कोणत्याही प्रकारचा धोका नाही. त्यामुळे या अंधभक्तांचे काय करायचं याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. या देशाच्या दुर्दैवाने अंधभक्तांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्या विरोधात जाणाऱ्याच्या जीवाला धोका होऊ शकतो. कारण त्यांच्यामागे पैसा आणि गुंडांची मोठी ताकद असते, त्या ताकतीसमोर सर्वसामान्य विचारवंत बुद्धिजीवी माणसाचे काहीही चालत नाही. देशाला भयमुक्त वातावरणात सक्षम बनवणे आणि लोकशाहीचे रक्षण करणे आज वाटते तितके सोपे राहिलेले नाही. निवडणुकीच्या वेळी जात-धर्म-प्रांत-भाषा यासारखे अनावश्यक मुद्दे उपस्थित करून लोकांची दिशाभूल केली जाते आणि त्याच जोरावर लोकांची मते मिळवली जातात. निवडणुकीच्या कालावधीत अंधभक्त बनवण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू असते. त्यासाठी पैशाचा वापर केला जातो आणि त्यातून अंध भक्तांचा एक मोठा वर्ग तयार केला जातो हाच अंधभक्तांचा वर्ग निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावतो आणि निवडणुका जिंकून देतो. त्यामुळे २०२४ झाली काय होणार हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आता राहिला सवाल विरोधी पक्षाचा तर विरोधी पक्ष एकत्र येऊ नये यासाठी जे प्रयत्न सुरू होते त्यांना यश येऊ लागले आहे. कारण इंडिया आघाडीतील आणि काँग्रेस यांच्यात दिल्लीतील सात लोकसभा जागांवरून त्यांना त्यांनी सुरू झालेली आहे. केवळ दिल्लीतच नाही तर देशाच्या इतर भागातही विरोधी पक्षांमध्ये एक वाक्यता राहिलेली नाही. त्यामुळे लोकांचाही त्यांच्यावर विश्वास नाही. परिणामी केंद्रातील आणि इतर राज्यांमधील सत्ता राखण्यात भाजपाला यश येणार आहे.

## 'माझी माती माझा देश'; पालघर जिल्ह्यातील ४७४ ग्रामपंचायतींचा सहभाग

भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पुर्ण झाल्याच्या स्मरणार्थ आजादी का अमृत महोत्सव सांगता दिनांक ९ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत होणार आहे. यावेळी माझी माती माझा देश ही प्रस्तावित मोहीम स्वातंत्र्याच्या लढयासाठी ज्या वीरांनी सर्वोच्च बलीदान केले, आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या आदरसन्मानाकरिता आयोजीत केलेली आहे. प्रस्तुत मोहीमेचे उद्दिष्ट युवा पिढीमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करणे हे आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा हा महत्त्वकांक्षी कार्यक्रम देशाच्या आणि राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून ज्या क्रांतिवीरांनीआपले बलिदान दिले त्यांच्या प्रती एक आदर व्यक्त करण्याचा हा आगळा आणि वेगळा उपक्रम आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यात हा उपक्रम मोठ्या स्वरूपात सुरू झाला आहे. गावपातळीपासून ते राजधानी पर्यतया उपक्रमात हजारो जनतेचा सहभाग अपेक्षित आहे. शिलाफलक, वीरांचा सन्मान, वसुधा वंदन (अमृत वाटिका), पंचप्रण शपथ, आणि ध्वजारोहण व राष्ट्रगीतयांचा यात समावेश आहे. देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन, लोकसहभाग अशा सर्वांचा सहभाग यामध्ये आहे. पंच प्रण प्रतिज्ञा, वसुधा वंदन, वीरों का वंदन यांसारखे उपक्रम तसेच गाव, पंचायत, गट, शहर, नगरपालिकाक्षेत्रातील स्थानिक शूरवीरांच्या त्यागाला वंदन करणारे शिलाफलक किंवा स्मारक फलक शहरी आणि ग्रामीण भागात उभारण्यात आले आहेत. ही मोहीम मातीच्या रुपाने भुमीशी संबंध जोडून राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण करेल आणि भावी पिढी भारताच्या वारसाचे रक्षण करेल. या मोहिमेमध्ये सर्वग्रामपंचायतीमधून माती गोळा करुन तालुक्याचे ठिकाणी एकत्रित करुन तालुक्यातुन एक कलश दिल्ली (कर्तव्यपथ) येथे पाठवायचा आहे. या कार्यक्रमातंर्गतपंचप्रण शपथ कार्यक्रम अंर्तभुत असुन त्यामध्ये सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, तसेच शाळा व महाविद्यालयामध्ये पंचप्रण शपथ घेण्यात आली. यात, भारतास २०४७ पर्यत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करु. गुलामीची मानसिकत्यामुळापासून नष्ट करु. देशाच्या समृध्द वारशाचा गौरव करु. भारताची एकात्मता बलशाली करु आणि देशाचे संरक्षण करणायांप्रति सन्मान बाळगू आणि देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करु. अशी शपथ घेण्यात आली. या मोहिमेत पालघर जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ४७४ ग्रामपंचायतीनी सहभाग घेतला आहे. या सर्व ग्रामपंचायतीमध्ये शीला फलक उभारण्यात आले आहेत. या फलकावर आझादी का अमृत महोत्सव, प्रधानमंत्री यांचा व्हिजन २०४७ चा संदेश, स्थानिक शहीद वीरांची नावे, याचा उल्लेख आहे. वसुधा वंदन म्हणून ७५ देशी वृक्षांची रोपांची लागवड करुन अमृत वाटीका करण्यात येत आहे. वन विभाग आणि सामाजिक वनीकरण यांच्याकडून रोपे उपलब्ध करुन घेण्यात आली आहेत. संपूर्ण कार्यक्रमामध्ये स्थानिक प्रतिनिधी, महिला बचत गट, युवकमंडळ, शेतकरी मंडळ, सर्व नागरिक यांच्या लोकसहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात येत आहे. या कार्यक्रमादरम्यान ग्रामपंचायतींच्या हद्दीतील एकदोन मुठमाती घेऊन सन्मानपुर्वक पंचायत समिती स्तरावरील समन्वय अधिकाऱ्यांकडे देण्यात येत आहे. प्रत्येक गावातून एकत्रित झालेली माती एक पितळी कलशामध्येगोळा करुन या कलशावर तालुका, जिल्हा, राज्य यांचेनाव लिहून हा कलश दिल्ली येथे पाठविण्यात येणार आहे. 'मेरी मिट्टी-मेरा देश' अभियानात गाव आणि गट स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था तसेच राज्यस्तरावरील कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. दिल्लीत 'अमृतवाटिका' तयार करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन 'अमृत कलश यात्रा' काढण्यात येणार असून ही 'अमृत वाटिका' 'एक भारतश्रेष्ठ भारत' या वचनबद्धतेचे प्रतीक असणार आहे. जनसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी https://merimaatimeradesh.gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यातआले असून, माती किंवा मातीचा दिवा हाती धरून काढलेला सेल्फी नागरिक या संकेतस्थळावर अपलोड करू शकणार आहेत. या उपक्रमात सर्वांचा सक्रीय सहभागआणि आपल्या देशाच्या वीरांप्रतीची कृतज्ञता प्रत्येकाने व्यक्त करावयाची आहे. केवळ एखादा कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता गाव ते शहरांपर्यत आपल्या माती विषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी याबाबत अभियान स्वरुपातकार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या अभियानात ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी तसेच, नागरी भागात नगरपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका यांनी त्यांच्या स्तरावर अधिकाधिक लोकसहभागातून उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे.

**- अर्चना शंभरकर; जिल्हा माहिती अधिकारी, पालघर**

## आदिवासींनी उच्च शिक्षणासाठी योजनांचा लाभ घ्यावा -मुख्यमंत्री

**पालघर/प्रतिनिधी**

जल, जंगल, जमिनीचे रक्षण करत पर्यावरण जपणाऱ्या आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या सहाय्याने सर्वांनी काम करणे गरजेचे आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी सुरू केलेल्या शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी क्रांतीवीर बिरसा मुंडा यांना नमन करून जागतिक आदिवासी दिनाच्या सर्व आदिवासी बांधवाना शुभेच्छा दिल्या. आज पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील राजीव गांधी मैदान येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी विकास विभागामार्फत राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, श्रीमती कुमुद गावित, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खा. राजेंद्र गावित, आ.शांताराम मोरे, आ.श्रीनिवास वनगा, आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव प्रदीप कुमार व्यास हे व्यासपीठावर उपस्थित होते. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, शासनाने २५० आदिवासी आश्रम शाळांचा कायापालट केला आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परिक्षेचे मार्गदर्शन करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. १०० विद्यार्थ्यांना पीचडीसाठी छात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या गावात आदिवासींची लोकसंख्या पन्नास टक्क्यापेक्षा जास्त आहे. तिथे १७ संवर्गातील भरती ही स्थानिकांमधूनच करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधा आदिवासी पाड्यांपर्यत पोहोचविण्यासाठी रस्त्यांची उभारणी करण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला मान, सन्मान आणि विकासाची संधी देण्याचे काम प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या प्रेरणेने होत आहे. आज ऑगस्ट क्रांती दिन आहे. तसेच 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांचा शुभारंभही झाला आहे. भारताच्या स्वतंत्र चळवळीत आदिवासी बांधवांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण असल्याचे सांगून त्यांनी शहीद आदिवासींना नमन केले.

**देशाचा गौरव जपण्यात आदिवासींचे काम अविस्मरणीय - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

आदिवासींची प्राकृतिक परंपरा जपणारी जीवनशैली आहे. देशाचा गौरव जपण्यात आदिवासींचे काम अविस्मरणीय आहे,




असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. त्यांनी आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच मूल निवासींसाठीचा हा दिवस असल्याचे सांगितले. भगवान बिरसा मुंडा यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचाही गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. देशाच्या अर्थसंकल्पात आदिवासींसाठी पाचपट आर्थिक तरतूद वाढविली आहे. आदिवासी विभाग आणि ग्रामविकास विभागाच्या मदतीने प्रत्येक पाडा हा रस्त्याने जोडणार आहे. पालघर आणि गडचिरोली या आदिवासी बहुल भागात प्राधान्याने रस्त्याचे जाळे विकसीत केले जाणार आहे. शबरी योजनेची तरतूद तीन पटीने वाढविली आहे. प्रत्येक आदिवासी बांधवास पक्के घर मिळण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुमारे दोन लाख आदिवासींना वनहक्काचे पट्टे वाटप करण्यात आले आहेत. शासकीय रूग्णालय, उत्तम शाळा, पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम या सरकारच्या माध्यमातून होत असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

**आदिवासींच्या विकासासाठी निधी तातडीने देणार - उपमुख्यमंत्री अजित पवार**

आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक असलेला निधी तातडीने वितरीत केला जाईल असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, आदिवासी बांधव हे खऱ्या अर्थाने निसर्गाचे तसेच संस्कृतीचे संवर्धन करित आहेत. बहुसंख्य आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आठ तालुका असलेल्या पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली. हा जिल्हा पर्यटन स्थळ म्हणून अनेकांच्या पसंतीस उतरत असल्याचे त्यांनी सांगितले. पालघरमधील पर्यटन, खाद्यपदार्थ आणि कलेच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहनही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी केले. पालकमंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले की, आदिवासी पाडे हे मुख्य रस्त्यांना जोडणे आवश्यक आहे. या कामाला प्राधान्य देणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम तथा पालघर जिल्हा पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. जिल्हात ५६१ विकास कामं सुरू असून ८० अमृत सरोवर तयार होत असल्याचेही मंत्री श्री चव्हाण यांनी सांगितले. आदिवासींच्या पाड्यांना जोडणारे रस्ते, त्याच्यासाठी घरे, शिक्षणाच्या सुविधा, धान खरेदी, दाखले वितरण या सर्व योजना पारदर्शकपणे राबवून आदिवासींना जास्तीत जास्त लाभ देणार असल्याची ग्वाही आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी दिली. आदिवासी समाजाचे सांस्कृतिक वेगळेपणा, मानवतेबद्दल असीम श्रध्दा, निसर्गावरील अतुलनीय प्रेम आणि अत्युच्च प्रामाणिकपणा व पारंपरिक निखळ गुणांचा गौरव म्हणून दरवर्षी जागतिक स्तरावर ९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस महाराष्ट्रातील समग्र आदिवासी समाजासाठी अस्मितेचा व आत्मसन्मानाचा दिवस आहे. या कार्यक्रमामध्ये विविध शासकीय योजनांचा मान्यवरांच्या हस्ते लाभ वाटप कार्यक्रम व विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या आदिवासी बांधवांचा गुण गौरव करण्यात आला. यावेळी चाळीस प्रकारचे पारंपरिक नृत्य प्रकार सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिवासी विकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी जव्हार श्रीमती नेहा भोसले यांनी केले. माजी आमदार रवींद्र फाटक, आदिवासी विकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे, विवेक पंडीत, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके, अपर आयुक्त आदिवासी विकास बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, डहाणू प्रकल्प अधिकारी संजीता महापात्रा, जव्हार प्रकल्प अधिकारी नेहा भोसले, अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब फटांगरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थति होते.

## मनुष्याच्या संकुचित वृत्तीमुळेच सद्यस्थितीत विकार बळावत आहेत -पाथरीकर महाराज

लातूर : आजच्या धकाधकीच्या दिवसात मनुष्याची वृत्ती, विचारप्रणाली संकुचित होत चालली आहे. त्यामुळे समाजात विविध शारीरिक - मानसिक विकार बळावत आहे. त्या करीता प्रत्येकाने संकुचित वृत्तीचा त्याग करून प्रगल्भ विचारधारा जोपासली पाहिजे असे विचार प. पू. काशिनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर यांनी व्यक्त केले. प.पू. वसुंधरारत्न डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज सत्संग मंडळाच्या वतीने प. पू. काशिनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर यांच्या ८७ व्या भव्य सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या सत्संग सोहळ्याच्या संयोजक सौ. लताताई मुद्दे ह्या तर आयोजक सौ. संध्या प्रकाश बिडवे ह्या होत्या. महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडलेल्या या सत्संग सोहळ्यात उपस्थित भाविक भक्तांना मार्गदर्शन करताना पाथरीकर महाराज पुढे म्हणाले की, चांगल्या व्यक्तींच्या सान्निध्यात राहणे - वावरणे यालाच सत्संग असे संबोधले जाते. निर्विकार व्यक्तीच्या सान्निध्यालाही सत्संग म्हटले जाते. आज मानवात स्वार्थ खूप वाढला आहे. या स्वार्थीवृत्तीमुळेच संकुचितपणा वाढत आहे. त्याचे परिणाम काय आहेत हे आपण पाहत आहोत. म्हणून सुजाण नागरीकांनी संकुचित विचारधारेपासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्याकडे जे काही आहे ते समाजाला, गरजूंना मोकळ्या मनाने देत रहावे. आपण समाजाला जेवढे देऊ त्यापेक्षा अधिक ईश्र्वर आपल्याला देत असतो. देव कोणाला म्हणावे ? असा प्रश्र्न अनेकांना पडतो. स्वच्छ, निर्मळ अंतःकरणाने पाहिल्यास माणसातच काय तर दगडातही देव दिसतो. फक्त देवाचा शोध घेता आला पाहिजे. महात्मा बसवेश्र्वर, मन्मथ स्वामी यासारखी माणसातील देवांची अनेक उदाहरणे आपल्या समोर असल्याचे त्यांनी सांगितले. हजारोंच्या संख्येने लोक एकत्रित आल्याने सत्संग होत नाही तर चांगल्या मनाने, भावनेने एकत्रित येऊन मत - मन परिवर्तन होते त्याला सत्संग असे म्हणतात. माणसाने नेहमी आनंदी, समाधानी राहिले पाहिजे. पण तत्पूर्वी बुध्दीचा आनंदाशी किती संबंध येतो ते समजले पाहिजे. आपण किती काळ जगलो यापेक्षा कसे जगलो हे अधिक महत्वाचे असते. त्यासाठी प्रत्येकाने प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक केली पाहिजे असे पाथरीकर महाराजांनी सांगितले. यावेळी त्यांनी इष्टलिंग पूजेचे महत्वही अत्यंत प्रभावीपणे विषद केले.यावेळी गायक - वादक राजू वाघमारे यांनी महाराजांना संगीताची साथ दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. लताताई मुद्दे, सौ.संध्या बिडवे, बसवराज हेंगणे, पद्मीनी मुनाळे यासह डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज सत्संग मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

21 TO 27 AUGUST 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:48 PM Page 1



# लातूल येथील विलास कारखाना येथे ऊस विकास परीसंवाद संपन्न

लातूर/प्रतिनिधी

वैशालीनगर, निवळी, येथील विलास सहकारी साखर कारखाना लि. येथे कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना ऊसशेतीमध्ये दिवसेदिवस होत असलेले बदल आणि आधुनीक ऊसशेतीचे ज्ञान देता यावे यासाठी एक दिवसीय प्रशिक्षण आणि ऊस विकास परीसंवाद कार्यक्रम शेतकी विभागातील कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता. या परिषदेत वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी (बु) पूणे यथील तज्ञांनी मार्गदर्शन केले. विलास सहाकरी साखर कारखाना कार्यस्थळी गुरूवार दि. १७ ऑगस्ट रोजी एक दिवसीय प्रशिक्षण आणि ऊस विकास परीसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास व्हा.चेअरमन रवीद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथील शास्त्रज्ञ व मुख्य जनसंपर्क अधिकारी आर बी. भोईटे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्री. एस. जी. दळवी, डॉ श्री. जी. आर. पवार आणि वरिष्ठ ऊस रोग विकृती शास्त्रज्ञ डॉ. श्री. जी. एस. कोटगीरे, मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन डीग्रसे यांनी मार्गदर्शन केले. विलास सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनाने नेहमीच ऊसवीकासाचे नवनवीत तंत्र कारखाना कर्मचारी आणि सभासद, ऊसउत्पादक यांना अवगत व्हावे यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन केले. राज्याचे माजी वैदयकीय व सांस्कृतीक कार्यमंत्री तथा माजी



पालकमंत्री कारखान्याचे संस्थापक चेअरमन तथा संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख व कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासरावजी देशमुख यांच्या संकल्पनेतुन ऊस शेतीमध्ये वेळेनुसार होणारे बदल व आधुनिक ऊसयोती पध्दती यांचा अभ्यास होणेसाठी व त्यांचा वापर कारखाना परिसरातील ऊस उत्पादकांना करता यावा याकरीता एक दिवशीय प्रशिक्षण व ऊस विकास परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात वसंतदादा शुगर इनस्टिटयुट, मांजरी (बु) लातूर येथे पूणे यांचे तज्ञा मार्फत शेतकी विभागातील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी तज्ञांनी ऊस लागवड, निंदणी, पाणी व्यवस्थापन, खते व्यवस्थापन, कीटकनाशक व्यवस्थापन, रोग व्यवस्थापन, ऊस तोडणी आणि ऊस गाळप या विषयांवर ऊस उत्पादकांना मार्गदर्शन केले. त्यांनी ऊस शेतीमध्ये वेळेनुसार होणारे बदल आणि आधुनिक पद्धती यांचा वापर करून ऊस उत्पादन कसे वाढवता येईल याबद्दल ऊस उत्पादकांना माहिती दिली. तज्ञांना ऊस उत्पादकांनी ऊस शेतीशी संबंधित विविध प्रश्र्न विचारले. ऊस उत्पादकांच्या या प्रश्र्नांची उत्तरे त्यांनी दिली. ऊस उत्पादकांना ऊस शेतीमध्ये वेळेनुसार होणारे बदल आणि आधुनिक पद्धतीचा वापर करून ऊस उत्पादन वाढवता येईल यांची माहीती मिळाली. यावेळी बोलतांना कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे म्हणाले, ऊस शेतीसाठी लागणारे आधुनिक तंत्रज्ञान आवगत करुन त्याचा वापर कारखाना परिसरांतील ऊस उत्पादकांसाठी करुन हेक्टरी उत्पादकता वाढवावी असे कृषी विभागातील कर्मचारी यांना सांगीतले. तर संचालक अनंत बारबोले यांनी कमीत कमी क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त उत्पादकता वाढविण्याचा मंत्र सर्व ऊत्पादकां पर्यंत पोहोचला पाहिजे. तर कार्यक्रमाचे प्रास्तावीक करतांना कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी ऊस उत्पादकांची हेक्टरी ऊस उत्पादकता वाढवण्यासाठी विविध नाविन्यपुर्ण ऊस विकासाचे उपक्रम आपल्या कारखान्याकडून सातत्याने राबविले जातात. यापूढे देखील अशा प्रकारचे उपक्रम आणि योजना कारखाना परिसरांमध्ये राबविल्या जातील असे सांगितले.या एक दिवशीय प्रशिक्षण व ऊस विकास परिसंवादात वसंतदादा शुगर इनस्टिटयुट येथील तज्ञ आर.बी. भोईटे (शास्त्रज्ञ व मुख्य जनसंपर्क अधिकारी व्हि.एस.आय.) डॉ.एस.जी.दळवी (वरिष्ठ शास्त्रज्ञ), डॉ.जी.आर. पवार व त्याच्या सोबत डॉ.जी.एस. कोटगीरे (वरिष्ठ ऊस रोग विकृती शास्त्रज्ञ) यांनी मार्गदर्शन केले. सदरील एकदिवशीय परिसंवाद व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सुत्रसंचलन शेख यांनी केले तर अभार एस. डी.नरवडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ऊस विकास अधिकारी जहागीरदार सी.एम., शेतकी अधिकारी आनेराये एस.एस., कृषि पर्यवेक्षक, सोमासे, देसाई, मेंढेकर, पाटील, नवनाथ पाटील, कदम सर्व कृषि मदतणीस व सर्व शेतकी विभागातील कर्मचारी उपस्थीत होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासठी निकम ए. एन., भिसे एस.डी., दिलीप सोनकांबळे, दगडु काटकर, सुर्यवंशी एस. एस. यांनी परिश्रम घेतले.

# स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्मांना अभिवादन



पालघर/प्रतिनिधी

ब्रिटीश साम्राज्या विरोधातील चलेजाव चळवळीत सहभागी झालेल्या पालघर तालुक्यातील पाच स्वातंत्र्य सैनिकांना हुतात्म्य प्राप्त झाले होते. त्यांचे पुण्यस्मरण व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पालघर येथील हुतात्मा स्तंभ येथे आज हुतात्मा यांना आदरांजली वाहण्यात आली. सर्व मान्यवरांनी हुतात्मा स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. पालघर शहरातील सर्व बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या होत्या. हुतात्मा चौकाजवळ जिल्ह्यातील काशिनाथ हरी पागधरे (सातपाटी), गोविंद गणेश ठाकूर (नांदगाव), रामप्रसाद भीमाशंकर तिवारी, (पालघर), सकूर गोविंद मोरे (सालवड), रामचंद्र महादेव चूरी (मुरबे ) यांना १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात याच दिवशी हुतात्म्य आले होते. आज या हुतात्मा यांना आदरांजली वाहण्यासाठी येथील हुतात्मा चौकात पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, पालघरच्या नगराध्यक्षा डॉ. उज्वला काळे, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी भानुदास पालवे, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील तसेच विविध विभागातील अधिकारी वर्ग, हुतात्मा यांचे नातेवाईक, नागरिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# औसा तालुका पत्रकार संघांची मागणी, तहसीलदार यांना निवेदन




औसा/प्रतिनिधी

पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांच्यावर झालेल्या भ्याड हल्याच्या निषेधार्थ शुक्रवार, दि. १८ ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह औसा येथे बैठक घेऊन निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेतील मारहाण करणाऱ्या आमदारांसह गुंडाविरुध्द पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा. यासह आ.किशोर पाटील यांची आमदारकी रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन औसा तहसीलदार यांना कारवाई औसा तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आले. आमदार किशोर पाटील यांनी पत्रकार संदिप महाजन यांना माझ्या विरोधात बातमी का लिहिली म्हणून प्रथम शिवीगाळ केली, त्यानंतर आपल्या गुंडाकडून चौकात गाडी आडवुन, अमानुषपणे मारहाण केली. यात ते गंभीर जखमी झाले असून सदरची घटना निंदनीय आहे.लोकशाहीच्या चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारावर बातमी का दिली या कारणावरून मारहाण केली. या घटनेचा सबंध पत्रकारांच्या वतीने निषेध करुन पोलिस प्रशासनाने या घटनेची त्वरित दखल घेऊन गुन्हा दाखल करावा. जेणेकरून भविष्यात अशा घटना घडणार नाहीत. यावेळी वरील मागण्याचे लेखी निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी पत्रकार संघांचे अध्यक्ष काशिनाथ सगरे, सचिव महेबुब बक्षी, जेष्ठ पत्रकार राजू पाटील,संजय सगरे, राम कांबळे, उपाध्यक्ष बालाजी उबाळे, सहसचिव विनायक मोरे,विठ्ठल पांचाळ, विलास तपासे, एस.ए.काझी, इलियास चौधरी, वामन अंकुश, श्रीधर माने, शिवाजी मोरे, महेश कोळी, मजहर पटेल, पाशा शेख यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थीत होते.

# सुट्टीच्या दिवशी सोलापूर जिल्हा परिषदेचे प्रवेशद्वार बंद?

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

पारशी नववर्ष प्रारंभ दिनानिमित्त बुधवारी १६ ऑगस्ट शासकीय सुट्टी होती. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिलेल्या आदेशानुसार सुट्टी असलेल्या जिल्हा परिषदेचे मुख्य प्रवेशद्वार बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी कामावर आलेल्या कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. प्रवेशद्वार बंद ठेवण्यात आल्याने कर्मचाऱ्यांना आल्या पावलांनीच घरचा रस्ता धरावा लागला. अनेक कार्यालयांमध्ये कर्मचारी उशिरा आल्याच्या तक्रारी समोर येत असतात, मात्र सोलापूर जिल्हा परिषदेत कर्मचारी कार्यालयीन वेळच्या आधी येतात रात्री उशिरापर्यंत कार्यालयात थांबतात. यावर मुख्यकार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी पूर्वपरवानगीशिवाय कार्यालयात लवकर आल्यास व उशिरा गेल्यास कारवाई करण्याचे पत्र काढले आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी




अधिकारी मनीषा आव्हाळे या कर्मचारी व अधिकारी यांच्या कामात शिस्त आणण्यासाठी रुजू झाल्यापासून प्रयत्न करीत आहेत. जिल्हा परिषदेमध्ये अनेक कर्मचारी व अधिकारी हे वेळेआधी येणे उशिरा जाणे तसेच सुट्टीच्या दिवशी ही कामावर येत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आले त्यानुसार त्यांनी या प्रकारावर आळा घातला आहे कामानिमित्त वेळेआधी यावे लागल्यास व उशिरा जावे लागत असल्यास कार्यालय प्रमुखांची परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. पत्र काढून बुधवारी सुट्टीच्या दिवशी काही कर्मचारी आले होते. मात्र जिल्हा परिषदेच्या दरवाजा बंद असल्याने पुन्हा परत जावे लागले.

**...तर संबंधित व्यक्तीवर कारवाई होणार**

सोलापूर जिल्हा परिषदेचे कामकाज हे सकाळी साडे नऊ ते सात वाजेपर्यतच पूर्ण करायचे आहे सात वाजल्यानंतर कार्यालयात काम करायचे असल्यास कार्यालयीन प्रमुखांची परवानगी घेण्याची आदेश दिले आहेत. सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित असताना एखादा अनुचित प्रकार घडल्यास त्या संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.

# जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचा संघ महाराष्ट्र राज्य ज्युनिअर आंतर जिल्हा चषक २०२३साठी रवाना



जळगाव/प्रतिनिधी

जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचा संघ महाराष्ट्र राज्य ज्युनिअर आंतर जिल्हा चषक साठी रवाना झाला. महाराष्ट्र राज्य ज्युनिअर आंतर जिल्हा चषक २०२३ च्या स्पर्धा दि. १५ ते १७ ऑगस्ट २०२३ दरम्यान ठाणे येथील दादाजी कोंडदेव स्टेडियममध्ये होणार आहे. जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या मुलींच्या संघात रीत नाथांनी, गीता पंडित, संस्कृती चौधरी, इशिका शर्मा, राजश्री पाटील तसेच मुलांच्या संघात शुभम चांदसरकर, तेजम केशव, करण पाटील, जाझीब शेख, अर्श शेख, रौनक चांडक, दक्ष चव्हाण यांची निवड झाली आहे. या खेळाडूंसोबत संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक म्हणून जैन स्पोर्ट्स अकॅडमी चे प्रशिक्षक किशोर सिंह सिसोदिया यांची निवड करण्यात आली आहे. जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष तेजेंद्र महिंद्रा, सचिव विनीत जोशी, सहसचिव तनुज शर्मा, खजिनदार अरविंद देशपांडे, सदस्य शेखर जाखेटे यांनी पुढील स्पर्धेसाठी संघाचे कौतूक करून शुभेच्छा दिल्या आहे.

# वाकोदला कृषीचे पदवी महाविद्यालय बीएस्सी ग्रीकल्चर सुरू करावे; शरद पवार यांचा अशोक जैन यांना सल्ला!

जळगाव/प्रतिनिधी

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांची जन्मभूमी असलेल्या वाकोद येथील गौराई कृषी तंत्र निकेतन व कृषीतंत्र विद्यालयाला आज माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी भेट देऊन संस्थेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी केली. जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांनी श्री. शरद पवार यांचे स्वागत करून संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी शरद पवार यांच्यासमवेत माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, माजी खा. जयसिंगराव गायकवाड उपस्थित होते. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य देवेंद्र चौधरी, आशिष भिरूड, अजय काळे, जैन इरिगेशन सिस्टीम चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डा.अनिल ढाके, जैन फार्मचे व्यवस्थापक विनोदसिंह राजपूत यांनी कृषीशिक्षणास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद असल्याचे सांगून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची या तंत्रनिकेतनामुळे मोठी सोय झाल्याचे निदर्शनास आणुन दिले. कविवर्य



ना.धों. महानोर यांचे गाव असलेल्या पळसखेडा पासून वाकोदचे अंतर चार किमीचे असुन भवरलाल जैन आणि कवि ना.धों. महानोर यांची मैत्री वाकोद गावातूनच लहानपणापासून वाढीला लागली. त्यांच्या आठवणीही हे तंत्रनिकेतन पाहताना जागृत झाल्या. या आठवणींना शरद पवार साहेबांनी यावेळी उजाळा दिला. कंपनीचे अध्यक्ष अशोक जैन यांनी वाकोदचा वटवृक्ष, वाघूरचे पाणी, मरुभुमीतुन बाहेर पडताना ही भवरलालजी जैन तथा मोठ्याभाऊंची पुस्तके भेट दिली. वाकोदच्या या परिसरात ग्रिकल्चर बिएस्सी सुरू करावे व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्यासपिठ उपलब्ध करून द्यावे, असा सल्ला शरद पवार साहेबांनी यावेळी अशोक जैन यांना केला. भवरलाल एण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनतर्फे गेल्या १३ वर्षापासुन हे कृषी तंत्रनिकेतन चालविण्यात येत आहे. वाकोदच्या १०८ एकर परिसरात प्रात्यक्षिसह हे तंत्रनिकेतन विस्ताराले आहे. सातत्याने कायम अ श्रेणीत, कृषि क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचे कम्पस, उच्चविद्याविभुषित प्राध्यापक वर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा, सर्व सुविधायुक्त वसतीगृह, सुसज्ज ग्रंथालय व वाचनालय, बीएस्सी ग्रीची डीग्री पूर्ण करत असताना कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम देखील एकाच प्रक्षेत्रावर असलेली राज्यातील एकमेव संस्था आहे.

# पंढरपूरमध्ये नायब तहसीलदारासह तिघांना लाच घेतल्याप्रकरणी अटक

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

उपविभागीय अधिकाऱ्यांकडून शेत जमीन खरेदीची परवानगी मिळवून देण्याकरिता १५ हजारांची लाच घेतल्याप्रकरणी नायब तहसीलदारासह तिघाविरुद्ध पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. पंढरपूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार आप्पासाहेब शिवाजी तोंडसे (५६) खाजगी इसम तुकाराम बाळकृष्ण कदम (५९) व खाजगी इसम सचिन विठ्ठल बुरांडे (४६) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे आहेत. तक्रारदाराने त्यांच्या शेताच्या शेजारील १० गुंठे शेतजमीन खरेदी केली असून सदर शेत जमीन खरेदी करिता उपविभागीय अधिकारी पंढरपूर यांची परवानगी आवश्यक आहे. सदर परवानगी मिळण्याकरिता तक्रारदाराने उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर केला. सदरचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्याकडून मंजूर करून घेऊन शेतजमीन खरेदीची परवानगी देण्याकरिता नायब तहसीलदार अप्पासाहेब तोंडसे यांनी तक्रारदाराकडे वीस हजार रुपयांची लाचेची मागणी केली. तडजोडीअंति पंधरा हजार रुपये लाच रक्कम खाजगी इसम तुकाराम कदम यांच्याकडे देण्यास सांगितले. कदम यांनी ती रक्कम स्वीकारून सचिन बुरांडे यांच्याकडे दिले असता लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने त्यांना रंगेहात पकडले आहे. ही सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक सोलापूर विभागाचे पोलीस उपाधीक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार शिरीषकुमार सोनवणे, अतुल घाडगे, सलीम मुल्ला, राहुल गायकवाड यांनी केले आहे.

# भोपणी येथे लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

देवणी/प्रतिनिधी

देवणीतील भोपणी येथे लोकशाहीर साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे यांची १०३वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच लक्ष्मण डोपेवाड, लक्ष्मण रणदिवे, बिट जमादार सय्यद, सुनिल मोतिरावे, रवि मोतिरावे, इंद्रजित मोतिरावे, किसन पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी शालेय विध्यर्थिनी निकिता कांबळे यांनी मनोगतात म्हणाले की आण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकाळ खडतर जीवन व साहित्य लोकापर्यत पोहचवण्याचे काम केले आहे. आजही फकिरा कांदबरी महाराष्ट्राला पहिला बहुमान साहित्याचा माध्यमातून मिळवले आहे. अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पवाडे, लोकनाट्य हे कला जिवंत ठेवण्याचे काम फक्त



आण्णाभाऊ साठे यांनीच करु शकले आहे. म्हणून प्रत्येकाच्या घरा घरात अण्णाभाऊ साठे यांचा विचारांचा जागर गेला पाहिजे, असे सखोल मार्गदर्शन निकिता कांबळे केले. यावेळी सुत्रसंचलन पत्रकार लक्ष्मण रणदिवे यांनी केले. आभार इंद्रजित मोतिरावे यांनी मानले. यावेळी जयंती समिती अध्यक्ष सुनील मोतिरावे, उपाध्यक्ष रवि मोतिरावे, अनिल मोतिरावे, रामेश्वर मोरे, अंकिता कांबळे, निलेश कांबळे, सुधाकर, मोतिरावे,बालाजी, मोतिरावे, महेश मोतिरावे, एकनाथ मोतिरावे, अनिल रामा मोतिरावे, संभाजी मोतिरावे, अशोक मोतिरावे, संजय अंजुरे, दत्ता मोतिरावे, अजय मोतिरावे, तानाजी मोतिरावे, लक्ष्मण मोतिरावे, वैजनाथ मोतिरावे, शकुंतला मोतिरावे, हौशाबाई मोतिरावे, ललिता मोतिरावे, त्रिवण मोतिरावे, रूक्मिणबाई मोतिरावे, केवळबाई मोतिरावे आदिची उपस्थिती होती.

# हजरत शेखूल हिंद उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

जळगाव/प्रतिनिधी

मेहरून येथील हजरत शेखूल हिंद उर्दू प्राथमिक शाळा येथील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मदरसा अनवारूल उलूम चे प्रमुख मौलाना रहमान होते. प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव जिल्हा मनियार बिरादरीचे अध्यक्ष फारुख शेख, संचालक अब्दुल राऊफ व मुजाहिद खान(सिकलगर बिरादरी) सह रफिक पटवे व अल्ताफ शेख यांची उपस्थिती होती. जळगाव जिल्हा मन्यार बिरादरी मार्फत मागील अकरा वर्षापासून या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप बिरादरीच्या माध्यमाने करण्यात येते. यावर्षी गरजू विद्यार्थ्यांची संख्या बघता १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश देण्याची घोषणा




बिरादरीचे अध्यक्ष फारुख शेख यांनी केली आहे. त्यासोबत शाळेला लागणारे क्रीडा साहित्य सुद्धा बिरादरी व स्पोर्ट्स हाऊस जळगाव तर्फे दिले जात आहे. कार्यक्रमा ची सुरवात विद्यार्थी मोहम्मद साद याचे कुराण पठनाणे झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक वृंद शिरीन शेख, रुबीना खान, अमिन पठाण, मोहम्मद अर्शद, वसीम खान, शहीद अहमद आदींनी प्रयत्न केले. मुख्याध्यापक जानीसर अख्तर यांनी प्रास्ताविक केले नसरुद्दीन काझी शिक्षकाने सूत्रसंचालन केले व सौ शिरीन शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप मौलाना अब्दुल रहमान यांच्या दुवाने करण्यात आला.

21 TO 27 AUGUST 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:51 PM Page 1



पान १ वरून....

## पालिका आयुक्तांना देणार हितेंद्र ठाकूर...

महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे वाढत आहेत आणि त्यातून पालिका अधिकारी आपले उखळ पांढरे करून घेत आहेत, पालिका आयुक्तांना हे दिसत नाही का? बविआची सत्ता असताना पालिका क्षेत्रातील लोकांना एक दिवस आड करून का होईना पाणी मिळत होते. पण गेल्या तीन वर्षांपासून काही भागातील लोकांना व्यवस्थित पाणी मिळतेय, तर काही भागात पाच-पाच दिवस पाणी नाही. २०२२ आणि २०२३ मध्ये मुबलक पाऊस झाला. वसई-विरारला पाणी पुरवठा करणारी धरणे ओव्हर फ्लो झाली. तरीही लोकांना पाणी का मिळत नाही? या प्रश्नाचे उत्तर पालिका आयुक्तांनी द्यायला नको का? आणि या प्रश्नावर आयुक्त उत्तर देणार नसतील तर त्यांच्या विरुद्ध आमदारांनी संताप व्यक्त करू नये का? आमदारांनी आयुक्तांना फटकवण्याची भाषा केल्यामुळे विरोधी पक्षातील लोकांना खूप वेदना झाल्या आणि त्यांनी आयुक्तांना फटकावण्याची भाषा करणाऱ्या आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. काँग्रेस, जनता दल, आगरी सेना, प्रहार, भाजपा, शिवसेना, आम आदमी आदी सर्व विरोधी पक्षांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. पण याच लोकांनी पाण्यासाठी पूर्वी पालिका प्रशासनाच्या विरुद्ध मोर्चे काढले होते. याच लोकांनी वसई-विरार-नालासोपाऱ्यातील अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत पालिका प्रशासनाला जबाबदार धरले होते. त्यावरून पालिका आयुक्तांची कोंडी केली होती. तेच लोक आता पालिका आयुक्तांच्या पाठीशी उभे असल्याचे दिसत आहे. त्यांचा हा दुटप्पीपणा संतापजनक आहे. वसई-विरारमध्ये पालिका प्रशासनाचा अनागोंदी कारभार सुरु असताना जर हे लोक आमदार हितेंद्र ठाकुरांच्या जागी असते तर त्यांनी पालिका आयुक्तांची आरती केली असती का? किंवा पालिका आयुक्तांचा सत्कार केला असता का? याचे उत्तर या लोकांनी द्यावे आणि यापुढे पालिका प्रशासनाने काही जरी वेडे वाकडे केले तरी त्यांनी पालिका प्रशासनाच्या विरोधात आवाज उठवू नये. अन्यथा वसई विरारची जनता त्यांची डबल ढोलकी दोन्ही बाजूने फोडून टाकील. हे त्यांनी ध्यानात ठेवावे. वास्तविक या लोकांनी जनतेच्या नागरी सुविधांच्या प्रश्नांबाबत राजकारण न करता पालिका प्रशासनाच्या विरोधात एकजुटीने उभे रहायला हवे होते. पण आता लोकांना कळले कि या पुढाऱ्यांचा वसई विरारच्या जनतेला काहीच उपयोग नाही, त्यामुळे वसई विरारची जनताही या लोकांपासून चार हात दूर आहे. अर्थात ते काही असो आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या त्या वादग्रस्त विधानाचे आम्ही समर्थन करत नाही. पण त्याचबरोबर लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी जो संताप व्यक्त केला तो कुठे तरी बरोबर होता असं येथील जनतेला वाटते आहे.

## उसन्या पैशावरून मैत्रीत दुरावा ...

काम करीत होता. ब्याडकुड येथील महातेश पुजार हा त्याचा जवळचा जीवलग मित्र असून ते दोघे ही दारू प्यायला आणि पार्टी करायला एकत्र बसत होते. महातेश याच्या घरची परिस्थीती तशी बऱ्यापैकी असल्याने आणि त्याचेवर घरची कोणतीही जबाबदारी नसल्याने त्याचेकडे पैसे असायचे. घराच्या शेतीत तो कधी तरीच काम करीत होता. ते दोघे ही समवयस्क असल्याने दोघात उणे दुणे तसे काही नव्हते. महातेशला तसे काम नव्हते. तर अकबरला ही सारखे काम मिळत नव्हते. त्या दोघांचा रिकामा वेळ जात नसल्याने ते दोघे ही गावापासून लाब अंतरावर दारू प्यायला बसत होते. महातेंशच्या या सवयीमुळे त्याच्या आई वडिलांनी त्याला तंबी देऊन काही दिवस घराबाहेर ही काढले होते. त्यावेळी त्याच्या हातात पैसे नसल्याने ती कसा बसा वागत होता. त्यातच त्याला चोरी करण्याची सवय लागली. अकबर आणि तो गावातील आणि परगावातील म्हैशी चोरी करण्याचा गोरखधंदा करीत होते. गोठयात बांधलेल्या म्हशीचे दावे रात्रीच्या वेळी कापायचे आणि ती म्हैस लांबच्या बाजारात नेऊन विकायचे त्यातून त्या दोघांना ही जास्त पैसे मिळत असल्याने त्यांन तोच धंदा अवलबंला होता. एकदा दोनदा गावातील म्हैसी चोरताना ते दोघे सापडले ही होते.त्यावेळी गावातील लोकांनी त्या दोघांना हारुगिरी पोलीसांच्या ताब्यात ही दिले होते. त्यावेळी पोलीसांनी त्या दोघांना समज देऊन सोडून दिल्याने ते दोघे ही गावात उजळ माथ्याने फिरत होते. गावात त्या दोघांना कुणी विचारत ही नव्हते. ते दोघे ही चोरी करीत असल्याने अकबरचे ही काम गेले होते. त्यामुळे तो तसा रिकामा होता. त्याच्याकडे काम ही नव्हते. आणि दाम ही नव्हता. त्यामुळे त्याला खर्चाला उधारी उसणवार करावी लागत होती. मागच्या दोन महिन्यापूर्वी त्याने महातेंशकडून १० हजार रूपये उसणे घेतले होते. त्यावेळी त्याने घेतलेले पैसे तो त्याला दोन तीन आठवडयात परत करणार होता. परंतु हाताला काम नसल्याने त्याला पैसे परत देता येत नव्हते. त्याच्याकडे पैसे नाहीत हे बघून महातेंश त्याला घेतलेले पैसे परत करण्याचा तगादा लावीत होता. तो त्याचेकडे सारखे पैसे परत मागू लागला होता.महातेंश सारखा पैसे परत मागत असल्याने अकबरने काही कामा निमित्य त्याच्याकडून त्याचा मोबाईल मागून घेतला. त्याच्या मोबाईलमध्ये गावातील एका मुलीचे फोटो होते. ते अकबरला माहित होते. सहज म्हणून घेतलेला मोबाईल तो परत देत नव्हता. त्याचेकडे महातेंशने मोबाईल मागितला की तो काही तरी कारण सांगत होता. त्यात एका मुलीचा नको त्या अवस्थेतील फोटो आहे हे अकबरला माहित असल्याने तो ते फोटो व्हायरल करेल याची भिती महातेशला होती. तो त्याचेकडे मोबाईल आणि पैसे परत मागू लागला की, अकबरला त्याला ते फोटो व्हायरल करण्याची धमकी देत होता. या कारणातून त्या दोघात भांडण होत होते. तो पैसे ही देत नव्हता आणि मोबाईल ही देत नव्हता.त्यामुळे महातेंश अकबरवर चिडून होता. तु उसणे घेतलेले पैसे आणि मोबाईल देत नाहीस तर तुला बघून घेतो अशी धमकी त्याने अकबरला दिली.जीवलग मित्र आपल्याला धोका देतो आहे त्याला सरळ मार्गावर आणले पाहिजे म्हणून महातेंशने त्याला मारण्यासाठी एक वेगळीच योजना आखली. ज्या ज्यावेळी अकबरकडे त्याने पैसे आणि मोबाईल मागितले त्या त्यावेळी त्याने महातेशला त्या मुलीचे फोटा व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यामुळे अकबरचा कायमचा काटा काढला पाहिजे याचा तो विचार करू लागला. मित्र म्हणून त्याला डोक्यावर घेऊन नाचलो पण तोच आता आपल्या कानात मुतू लागला आहे याची जाणीव महातेशला झाली. त्या दोघात भांडण जरी असले तरी ते दोघे ही दारू प्यायला एकत्र बसत होते. बुधवार दि.१६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी महातेशने आपल्या एका मित्राच्या मदतीने अकबरला दारू पिण्यासाठी बोलावून घेतले. ते तिघे ही ब्याडकुड गावाजवळील जंगलात दारू पिण्यासाठी गेले. अकबरला मारण्याची तयारी महातेंशने अगोदरच केली होती. दूर जंगलात ते तिघे ही दारू प्यायला बसल्यावर तिघांना ही दारूची नशा चढली. ते तिघे ही कन्नडमध्ये एकमेकांना शिव्या देत होते. त्यातच महातेशने अकबरकडे उसणे दिलेल्या पैशाचा विषय काढला. दारूच्या नशेत असणाऱ्या अकबरने त्याला माझ्याकडे आता दोन तीन महिने पैसे नाहीत तू काही माझ्याकडे पैसे परत मागू नकोस. तु जर मला तगादा लावलास तर मी तुझ्या मोबाईलमधील तुझ्यासोबत नको त्या अवस्थेत असणाऱ्या मुलीचा फोटो व्हायरला करून बदनामी करेन अशी धमकी दिली. त्याची ही धमकी ऐकून महातेश हा त्याचेवर चिडला. त्या दोघात हाणामारी सुरू झाली. अकबरने महातेशला शिव्या देत खाली पाडले. त्या सरशी महातेशने उठून त्याला परत खाली पाडले. तो त्याच्या उरावर बसला आणि आपल्याकडील धारदार कोयता काढून त्याचेवर सपासप वार केले. दोघाच्या हातापाईत दारूचे ग्लास, बाटल्या आणि स्नॅक्स विस्कटले गेले. अकबर हा रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडला. त्याचा गळा ही चिरला गेल्याने रक्तस्त्राव मोठया प्रमाणात सुरू होते. तो निपचिप पडल्याचे बघून महातेशने आपल्या दुसऱ्या मित्राला इशारा केला. त्या दोघांनी आता पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याला बाजुला ओढत नेले.तेथे त्यांनी त्याच धारदार कोयत्याने अकबरचे शीर धडा वेगळे करून बाजुला टाकले. ते शीर त्यांनी झाडाझुडपात टाकून देऊन धड ही वेगळ्या ठिकाणी टाकून दिले आणि घटनास्थळावरून पोबारा केला. रात्रभर अकबर घराकडे आला नसल्याने त्याच्या घरच्या लोकांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. हारुगिरी येथून गाडीवर महातेशबरोबर जाताना त्या तिघांना गावातील लोकांनी पाहिले होते. म्हणून अकबरच्या घरच्या लोकांनी अकबरची चौकशी महातेश पुजारीच्या घराकडे जावून केली. पण तो ही काल रात्रीपासून घराकडे आला नसल्याचे त्यांना समजले. अकबर आणि महातेशची भांडणे आहेत हे अकबरच्या घरच्या लोकाना माहित होते. त्यामुळे त्यांनेच अकबरचे काही तरी बरे वाईट केले असावे म्हणून त्याच्यावर संशय घेऊन हारुगिरी पोलीस ठाण्यात अकबर जमादार हा हरविला असल्याची तक्रार दिली.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना ब्याडकुड बस्तवाड गावाजवळील जंगलात एक शीर नसलेले धड पडले असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी घटनास्थळी जावून ते शीर नसलेले धड ताब्यात घेऊन घटनास्थळाचा पंचनामा करून तपासाला सुरूवात केली. हे धड पोलीसांनी तपासणीसाठी हारुगिरी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना ते धड हारुगिरी येथील बेपत्ता असलेल्या अकबर जमादार याचा असल्याचे समजले. मयत अकबर बरोबर महातेश पुजार हा त्याचा मित्र घटनेच्या वेळी होता याची माहिती पोलीसाना मिळाल्याने पोलीस त्याचा शोध घेऊ लागले. तो शेतातील घरात लपून बसल्याचे पोलीसांना समजल्यावर पोलीसांनी त्याला तेथून ताब्यात घेऊन हारुगिरी पोलीस स्टेशनला आणले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीस करीत असताना तो पोलीसाना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल केला. पोलीसांनी त्याला घटनास्थळी नेऊन धड शोधण्याचा प्रत्यन केला परंतु ते धड काही लवकर पोलीसाना सापडले नाही. घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.संजीव पाटील यांनी भेट देवून पाहणी केली. त्यांनी पोलीसाना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. मयत अकबर जमादार याची आई खैरून जमादार यांनी दिलेल्या तक्रीवरून पोलीसांनी अकबर शब्बीर जमादार (वय २२) याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी महातेश सोमनिंग पुजार (वय २३) व त्याच्या अनोळखी मित्राविरूध्द आयपीसी कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून महातेंश पुजार याला कोर्टासमोर उभे केले असता कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा पुढील तपास हारुगिरी पोलीस करीत आहेत. मित्राची मैत्री ही कधी तरी डोक्यावर बसते. त्यात पैशाचा व्यवहार आला की ती मैत्री तुटते हेच या घटनेवरून दिसून येते.

## चारित्र्याच्या संशयावरून पतीचा ...

झाल्या असून त्यांचा मृत्यू झाला आहे. नंदा चौरे या आपल्या स्कुटीवरून जात असतांना एम.के. बिअर शॉपी, महाराष्ट्र बँकेमागे रस्त्यावर एका अज्ञात वाहनाने त्यांना ठोकर दिल्याने नंदा चौरे या खाली पडल्या आणि जखमी झाल्या. त्यांच्या पतीने मच्छिंद्र भगवान चौरे यांनी त्यांना लोकमान्य हॉस्पिटलमध्ये दाखल केले, पण त्या मृत झाल्या आहेत. नंदा यांच्या डोक्यास आणि उजव्या डोळ्याला मार लागला आहे. डॉ. गवळी यांनी दिलेली ही खबर ऐकताच आडगाव पोलिसांनी लोकमान्य हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. मृतदेहाची पाहणी करुन त्यांनी घटनास्थळाची देखील पाहणी केली. त्यानंतर पंचनाम्याचे सोपास्कार पार पडल्यानंतर मृतदेह सिव्हील हॉस्पीटल नाशिक येथे पोस्टमार्टमसाठी पाठवला. यानंतर आडगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून ७३/२०२३ या क्रमांकाने नोंद घेण्यात आली. दरम्यान पोलिसांना पोस्टमार्टम अहवाल प्राप्त झाला. त्यामुळे पोलिसांना हा अपघात आहे की घातपात याविषयी शंका येवू लागल्यामुळे पोलिसांनी या घटनेचा सखोल तपास करण्याचे ठरवले. त्याआधी पोलिसांना डॉ. ओमकार गवळी यांच्याकडून अपघात कसा घडला याची माहिती मिळाली होती. खरे तर त्यांनी दिलेली माहिती ऐकीव होती. पत्नीला हॉस्पिटलमध्ये दाखल करतांना मच्छिंद चौरे यानेच आपल्या पत्नीचा अपघात कसा झाला याविषयी सांगितले होते. तीच माहिती डॉ. गवळी यांनी पोलिसांना दिली होती, पण हा अपघात नसून घातपातच असावा अशी शंका आल्याने पोलिसांनी तपासास सुरूवात केली. या घटनेतील मृतक नंदा चौरे ही नाशिक शहरातील श्रीरामनगर महाराष्ट्र बँकेसमोर, जत्रा हॉटेलजवळ असणाऱ्या एका अपार्टमेंटमध्ये रहात होती. तिचा पती मच्छिंद्र भगवान चौरे हा टेलरींगचा व्यवसाय करत असून तो मूळचा नागझरी नाफेड, ता. केज, जि. बीड येथील आहे. या दाम्पत्याला मयुरेश आणि अंकिता अशी दोन अपत्ये आहेत. नंदा हिचे माहेर देवाची आळंदी येथील आहे. घटनेच्या आदल्या दिवशी म्हणजेच मंगळवार दि. २७ जून २०२३ रोजी मच्छिंद्रने आपला मुलगा मयुरेश याला देवाची आळंदी येथे पाठवून दिले होते. मुलगी अंकिता ही आक्षेवाडी येथील रामशेज किल्ल्यावर ट्रेकींगसाठी गेली होती. घटनेदिवशी घरामध्ये नंदा आणि मच्छिंद्र असे दोघेच होते. प्राथमिक चौकशीत मच्छिंद्र चौरे याने सांगितले की, बुधवार दि. २८ जून २०२३ रोजी पत्नी नंदाच्या स्कुटीवरून तिला पाठीमागे बसवून बाहेर गेला होता. एम.के. बिअर शॉपीजवळ एका वाहनाने मागून ठोकर दिल्याने नंदा ही खाली पडून जखमी झाली होती. त्यावेळी मच्छिंद्रने धात्रक फाट्यावर असलेल्या लोकमान्य हॉस्पिटलमध्ये दाखल केले, पण त्याने दिलेली माहिती पोलिसांना समाधानकारक वाटत नव्हती. कारण त्याने अपघात झाल्याची माहिती दिली असली तरी वैद्यकीय अहवालावरून हा अपघात नसल्याचे दिसत होते, त्यामुळे पोलिसांनी तपास सुरूच ठेवला.

सर्वप्रथम नातेवाईकांकडे चौकशी केली, तेंव्हा मच्छिंद्र याच्या दोन्ही साडूंनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांच्या संशयास बळकटी मिळू लागली. नंदा चौरे हिचे दोन्ही दाजी म्हणजेच मच्छिंद्र याचा एक साडू शामसुंदर मुरलीधर ढोले (रा. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे) आणि दुसरा साडू शिवाजी दिगंबर गंभिरे (रा. मदर टेरेसा, पत्रेनगर, मुंबई-आग्रा रोड, नाशिक) या दोघांकडे पोलिसांनी मच्छिंद्र याच्याबाबत माहिती विचारली. त्याचे आणि पत्नीचे संबंध कसे होते याबाबत प्रश्न विचारला असता त्या दोघांनी सांगितले की, एका नातेवाईकांच्या घरी दुःख सावरण्याच्या कार्यक्रमासाठी आम्ही एकत्र आलो होतो, तेंव्हा मच्छिंद्र यांचे वागणे बदललेले दिसून आले. त्या नवरा-बायकोमध्ये काहीतरी घुसफूस आहे हे त्यावेळी आम्हाला जाणवले, म्हणून त्या दोन साडूनी मच्छिंद्रकडे याची विचारणा केली, तेंव्हा मच्छिंद्र हा काही न बोलता गप्प बसला. त्याचे ते गप्प बसणे त्या दोन साडूंना खटकले. नक्कीच या दोघा नवरा-बायकोमध्ये काहीतरी वाद आहेत हे त्यांना समजून आल्याने त्यांनी मच्छिंद्रला बाजूला नेवून त्याला विश्वासात घेवून त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी मच्छिंद्रने आपल्या बायकोबाबत सांगितले. 'नंदा आता पहिल्यासारखी राहिली नाही. तिचे एका व्यक्तीशी संबंध आहेत. मी तिला खूप वेळा समजावून सांगितले, पण ती माझे काहीही ऐकत नाही. आता आमच्या घरात या कारणावरून नेहमी वाद होतात. यामुळे मुलेही बावरून जातात. मला काय करावे हे सुचत नाही. असे मच्छिंद्रने सांगितल्यावर या दोन्ही साडूंना काय करावे हेच समजेनासे झाले. हा दोघा पती-पत्नीमधील नाजूक मामला होता. हा तसाच नाजूकपणे हाताळला पाहिजे म्हणून त्यांनी मच्छिंद्रला धीर दिला आणि कार्यक्रम झाल्यावर ले निघून गेले. पोलिसांनी या नातेवाईकांकडून ही माहिती ऐकून घेतल्यावर मच्छिंद्रकडे चौकशी केली, पण तो सुरूवातीला आपल्या पत्नीचा अपघात झाल्याचेच सांगत होता, पण पोलिसांनी त्याला धारेवर धरल्यानंतर मात्र त्याला आपला गुन्हा कबुल करावाच लागला. मच्छिंद्र चौरे याने दिलेल्या कबुली जबाबानुसार, त्याच्या पत्नीचे अनैतिक संबंध असल्यामुळे तिच्याविषयी त्याच्या मनात खूप राग होता. ती काही केल्या ऐकत नसल्याने तिचा काटा काढायचा विचार त्याने केला. मंगळवार दि. २७ जून २०२३ रोजी आपला मुलगा मयुरेश हा सासू आशाबाई यांच्याकडे देवाची आळंदी येथे पाठवले. मुलगी अंकिता ही आधीच ट्रेकींगसाठी गेली होती. आता घरात दोघेच होते. सकाळचे १० वाजले होते. नंदा आपल्या कामात व्यग्र होती. तिच्या साऱ्या हालचाली मच्छिंद्र न्याहाळत होता. तिच्या एकूण हालचाली पाहून त्याच्या मनात तिच्या अनैतिक संबंधाविषयी विचार येत होते. मनातल्या मनात तो तिच्यावर चिडत होता. एका क्षणी त्याचा राग उफाळून आला आणि त्याने घरातील लोखंडी मुसळी घेतली. तिचे लक्ष नसतांना डोक्याच्या पाठीमागील बाजूस जोराने मारली. मुसळी इतक्या जोराने मारली होती की तिच्या नाका-तोंडातून रक्त येवू लागले. अतिरिक्तस्त्राव होवून ती खाली जमिनीवर निपचित पडली. ती मरण पावल्याची खात्री झाल्यावर मात्र तो घाबरून गेला. पत्नीचा खून तर झाला होता, पण पुढच्या परिणामाची जाणीव होवू लागल्याने त्याला काय करावे हेच सुचेनासे झाले. त्यावेळी त्याने आपला भाचा सुरेश कराडला घरी बोलावून घेतले. तो घरात आला. घरामध्ये मामीचा मृतदेह पाहून त्यालाही धक्काच बसला. त्याने आपल्या मामाकडे विचारणा केली असता मच्छिंद्र चौरे याने शांतपणे आपल्या पत्नीच्या बाहेरख्यालीपणाबद्दल सांगितले. त्या रागातूनच आपण तिला मारले असे सांगितल्याने भाच्यालाही मामाची दया आली. त्याने मच्छिंद्रला एक युक्ती सांगितली, जेणेकरून हिच्या खुनाचा ठपका येणार नाही. सुरेश कराडने मच्छिंद्रला सांगितले की, 'नंदा मामीचा अपघात झाला आहे हे आपण दाखवू, त्यासाठी तू मामीची स्कुटी घेवून जा आणि तिची तोडफोड कर आणि ती एका ठिकाणी ठेवून ये' असे सांगितले. त्याप्रमाणे मच्छींद्र हा पत्नीची स्कूटी घेवून गेला. त्याने तिची तोडफोड करून ती स्कुटी एम. के. बिअर शॉपीच्या समोरील जत्रा हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर असणाचा दिशादर्शक बोर्डच्या पोलजवळ ठेवली. त्यानंतर पत्नी नंदा हिला पात्रक फाट्यावर असलेल्या लोकमान्य हॉस्पिटलमध्ये तिचा अपघात झाल्याचे सांगून दाखल केले.

पत्नीचा खून करून तो अपघात झाल्याचे भासवण्याचा खेळ मच्छिंद्र चौरे याने केला होता. पण पोलिसांच्या तपासात त्यांचे पितळ उघडे पडले. मच्छिंद्र भगवान चौरे (४०) याला पोलिसांनी ताब्यात घेतले होतेच, आता त्याचा भाचा सुरेश कराड यालाही ताब्यात घेतले. नंदा चौरे खून प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा रजि. नं. १९९ / २०२३.भा.दं.वि. कलम ३०२, २०१ व ३४ प्रमाणे नंदाचा पती मच्छिंद्र भगवान चौरे व भाचा सुरेश तुळशीराम कराड रा. आडगाव, नाशिक यांच्यावर गुन्हा दाखल केला. पुढील तपास उपनिरीक्षक सुभाष जाधव हे करत आहेत.

पान ८ वरून....

## इतिहास वाचलात तर इतिहास घडवाल...

उध्दार होईल असे विचार अध्यक्षीय समारोपात गणपतराव तेलंगे यांनी मांडले.अमृतराव सूर्यवंशी यांनीही विचार व्यक्त केले. प्रारंभी वसंतराव वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीतासह झेंडयाला सलामी देण्यात आली.मान्यवरांचे ग्रंथ व गुलाबपुष्पहाने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव बी.जी. होळीकर यांनी केले. लिपीक संकेत होळीकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला ग्रंथपाल अंजुषा काटे, वाचक रमेश शिंदे,आकाश व्यवहारे,गांधी वेशातील यश धावारे, समर्थ शिंदे, गौरी शिंदे, स्मिता शिंदे, अक्षरा कदम, हिरामन आचार्य, वनिता आचार्य, रुद्रेश कांबळे, मनोज शिंदे आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना एकरी १ लाख रुपयांची ...

नागरगोजे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मनसेने केलेल्या आंदोलनादरम्यान केली. आठवड्यात जर शासनाने दुष्काळ जाहीर नाही केला तर मंत्र्यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही व संपूर्ण जिल्ह्यातील शेतकरी सोबतीला घेऊन रस्त्यावर उतरू असा सज्जड इशारा दिला आहे. या तीव्र निदर्शने आंदोलनात मोठया संख्येने जमलेल्या मनसैनिकांनी बराच काळ जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनाची सांगता जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देऊन करण्यात आली. ज्यात जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासोबतच वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी शेतकर्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत मिळावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात संतोष नागरगोजे, नर्सिंग भिकाने, शिवकुमार नागराळे, संजय राठोड, भागवत शिंदे, बाळासाहेब मुंडे, रणवीर उमाटे, संग्राम रोडगे, सोमनाथ कलशेट्टी, महेश देशमुख, श्रीनिवास शिंदे, रवी सूर्यवंशी, सचिन शिरसाठ, अंकुश शिंदे, किरण चव्हाण, प्रीतीताई भगत, महेश माने, वाहीद शेख, मनोज अभंगे, अनिल जाधव,रामदास पाटील, संतोष भोपळे, सुनील तोडचीरकर, परमेश्वर पवार, जहांगीर शेख, अनिल जाधव, बजरंग ठाकूर, अजिंक्य मोरे, ऋषिकेश माने, संतोष जाधव, शुभम चंदनशिवे,रामदास तेलंगे, गुरुदास घोणसे, अनिल भंडे, पवन राजे, मेहत्रे लाला, मोहिते भोसले, सचिन बिरादार, महेश बनसोडे, पवन सरवदे, सचिन इगे, सुरेश गालफाडे,चेतन चव्हाण,विशाल कातळे,लक्ष्मण लांडगे आधीसह मनसेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विरार पोलिसांनी साजरा केला ...

कार्यक्रम मंगळवारी सकाळी पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवला होता. सदरची कामगिरी परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त सुहास बावचे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप राख, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलीस हवालदार सचिन लोखंडे, संदिप जाधव, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, विशाल लोहार, योगेश नागरे, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी केलेली आहे.

## बांबू पैसा देणारे पर्यावरणपूरक ...

आहे. त्यासाठी याचे सूक्ष्म नियोजन करून अधिकाधिक क्षेत्र बांबू लागवडीखाली आणून आपल्याला यातही लातूर पॅटर्न निर्माण करायचा आहे. त्यामुळे ग्रामस्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंतच्या प्रशासकीय यंत्रणांनी सक्रिय काम करायचे असून शेतकऱ्यांना बांबू लागवड त्यासाठी मनरेगाकडून कुशल, अकुशल मिळणारी आर्थिक मदत, रोपांची उपलब्धता, विक्रीला अजून तीन वर्ष आहेत. पण विक्री व्यवस्था पण सांगावी त्यातून शेतकरी पुढे येतील. वातावरण बदल, प्रदूषण यावर मात करायची असेल तर बांबू लागवड हा उत्तम पर्याय आहे. गावांनी ठरवलं तर हे सहज शक्य असल्याचे सांगून यामुळे लातूर जिल्ह्याचा ग्रीन बेल्टही वाढणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी सांगितले. आपल्याला पुढच्या पिढीला शुद्ध हवा आणि पाणी द्यायचं असेल तर हवेतलं कार्बनच प्रमाण कमी करावं लागेल आणि मातीची धूप थांबवून जमिनीत पाणी मुरवावं लागेल. त्यासाठी बांबू लागवड हा आर्थिकदृष्ट्या उत्तम पर्याय आहे. बांबू हे गवतवर्गीय केल्यामुळे तुम्हाला लागवड आणि तोड करण्यासाठी कुठलेही बंधन नाही. बांबूचा उपयोग इथेनॉल पासून ते थर्मल पॉवरचं इंधन म्हणून होत असल्यामुळे हे बहुउद्देशीय पीक तुम्हाला अत्यंत फायदेशीर असल्याचे माजी आमदार पाशा पटेल यांनी विविध उदाहरणासह पटवून दिले.बांबू विक्री, बांबू लागवड कशी करावी यासह थर्मल पॉवरमध्ये इंधन म्हणून वापरताना बांबूची कॅलरीक क्षमता दगडी कोळशा एवढीच असल्याचे या प्रशिक्षणामध्ये सांगण्यात आले. यावेळी गादवड, आलमला, किल्लारी, वडजी, जेवरी यासह बांबू लागवड करणाऱ्या दहा गावांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. वैयक्तिक बांबू लागवड करणारे शेतकरी आर. बी. पाटील यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. डबांबू लागवडीविषयी माजी आमदार पाशा पटेल यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमात सर्वांचा सत्कार करताना बांबू पासून बनवलेल्या मुर्त्या, बांबूचे रोप देवून करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## ७६व्या स्वातंत्र्य दिनी विद्यार्थ्यांना ...

म्हणाले की, गरजू विद्यार्थ्यांना अशा पद्धतीने मोफत सायकल वाटप करणारी आदर्श मैत्री फाउंडेशन ही बहुधा मराठवाड्यातील पहिली सामाजिक संस्था आहे. मात्र फाउंडेशनने फक्त ७६ सायकल पर्यंतच मर्यादित न राहता हा उपक्रम येत्या काळातही असाच सुरु राहावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तत्पूर्वी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श मैत्री फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी केले. सायकल बँक उपक्रम राबविताना कशा अडचणी यावर प्रकाश टाकला. तसेच उपक्रमावर विश्वास टाकणाऱ्या सर्व दानशूरांचे आभार मानित फाउंडेशनच्या उपक्रमाची माहिती दिली. याप्रसंगी पत्रकार शशिकांत पाटील, उद्योजक तुकाराम पाटील यांची भाषणे झाली. तर गरजू विद्यार्थी आणि शिक्षकांनीही यावेळी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवलिंग नागापुरे सर व शुभांगी राऊत यांनी केले. तर आभार ओमप्रकाश झुरळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सायकल बँकचे समन्वयक प्रमोद भोयरेकर, राजेश मित्तल, संतोष बालगीर यांनी परिश्रम घेतले. यावेळी निलेश राजमाने, सोनू डगवाले, शशिकिरण भिकाने, असिफ शेख, इस्माईल शेख, सुधाकर तोडकर, दासराव शिरुरे, वसंतराव कातळे, श्रावण चव्हाण, अमोल जानते, संभाजी माळी, सूर्यकांत कटारे, संपत जगदाळे, संभाजी माळी, सतीश पवार, महादेव पांडे, नागनाथ आगवाणे, राम स्वामी, संभाजी नवघरे, नरसिंग कातळे, मदन भगत, आदित्य उटगे, आदींची उपस्थिती होती.

## भिवंडी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी...

आयुष्याची दुर्दशा करते.कामगार कर्मचारी यांना नशेच्या दुष्परिणामांची माहिती नसते यातून बाहेर कसे पडायचे हे माहीत नसते. आपण जर मनाचा निश्चय केला तर कोणतीही नशा आपण सहजपणे सोडू शकतो त्याप्रमाणे आचरण करणे देखील आवश्यक आहे. पालिकेच्या कामगारांच्या आरोग्याचे काळजी घेणे, त्यांचे जीवनमान सुरक्षित चांगले करणे, हे देखील आपले महत्त्वाचे काम आहे. प्रत्येक कामगारांनी या नशा मुक्ती केंद्राचा लाभ घ्या, जो कोणी ह्यात टाळाटाळ करेल त्याच्या विरोधात कारवाई करण्याचा देखील इशारा आयुक्त अजय वैद्य यांनी शेवटी दिला. यावेळी प्रजापिता ब्रह्म कुमारीच्या अलका दीदी यांनी देखील मार्गदर्शन करताना नशा मुक्त भिवंडी नशा मुक्त भारत हे संस्थेचे ध्येय असून ते साध्य करण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन करीत पालिकेने या उपक्रमास प्रतिसाद दिल्या बद्दल समाधान व्यक्त केले.

## जुन्या पुलांवरील कठडे झाले ...

उभारले जातात ज्यामुळे पुलांचे सौंदर्य लुप्त झाले असून हा घाट केवळ कंत्राटदारांच्या सोईसाठी घातला जात असल्याचा आरोप केला जात आहे. तातडीने सार्वजानिक बांधकाम विभागाने याबाबत गंभीर दखल घेऊन पुलांच्या सुरक्षेची जबाबदारी घ्यावी अशी मागणी केली जात आहे. वाडा उप विभागाचे अभियंता संजय डोंगरे यांना संपर्क केला असता कठड्यांची कामे करण्यास कंत्राटदार नेमीत आहोत असे त्यांनी सांगीतले.

21 TO 27 AUGUST 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 8/19/2023 8:52 PM Page 1



# जुगारी अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड; ८ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने लातूर शहरासह देवणी तालुक्यात राजरोसपणे चालत असलेल्या जुगारी अड्ड्यावर धाड मारून ८ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने दिनांक ०७ व ०८ ऑगस्ट २०२३ रोजी अवैध धंद्यावर छापेमारी करत जुगार, दारूबंदी कायद्यान्वये ५ जनांविरोधात गुन्हे दाखल करुन ०७ लाख ६ हजार ५२० रुपयाचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना ताजी असतानाच ०८ ऑगस्ट रोजी रात्री मिळालेल्या गुप्त माहिती आधारे लातूर जिल्ह्यातील देवणी व लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत छापेमारी करून आणखीन ३८ जणांना ताब्यात घेत त्यांच्या विरुद्ध जुगार प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हे दाखल केले आहेत.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यात अवैध धंद्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, लातुर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात अवैध धंद्याविरुद्ध मोहीम राबविण्यात येत आहे. अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना पथकांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दिनांक ८ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी स्थानिक गुन्हे शाखेच्या एका पथकाने देवणी तालुक्यातील शिवकुमार लुल्ले यांचे शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये तर दुसऱ्या पथकाने लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील ६० फूट रोडवरील अशोका बारच्या पाठीमागे पत्राच्या शेडमध्ये चालू असलेल्या जुगारावर छापा मारला असता तेथे विश्वंभर बसवंतराव जाधव, (वय ५१ वर्ष, राहणार कासारतुगाव, तालुका भालकी जिल्हा बिदर), बंडाप्पा काशिनाथ गडमाले, (वय ५३ वर्ष, राहणार बसस्थानकाच्या पाठीमागे, देवणी.), विलास संग्राम गरिबे, (वय ५० वर्ष, राहणार नेकनाळ, तालुका देवणी), सोमनाथ राचप्पा भदरशेटे,( वय ५८ वर्ष, राहणार लुल्ले गल्ली, देवणी.), पांडुरंग विठ्ठलराव मुळे, (वय ३२ वर्ष, राहणार दवणगाव, तालुका उदगीर.) लहू राम सूर्यवंशी, (वय ३४ वर्ष, राहणार फुलेनगर, देवणी.) ज्ञानेश्वर गोपीनाथ विभुते, (वय २७ वर्ष, राहणार शिवनी, तालुका भालकी जिल्हा बिदर.) संतोष शालिवाहन विभुते, (वय ३७ वर्ष, राहणार शिवनी तालुका भालकी, जिल्हा बिदर.) बालाजी विठ्ठलराव बिराजदार- पाटील, (वय ५४ वर्ष, राहणार कासारतूगाव तालुका भालकी.) शकील रहीम साहब कुरेशी, (वय ४३ वर्ष, राहणार कासारतुगाव तालुका भालकी जिल्हा बिदर.) सिकंदर गुणवंत जाधव, (वय ४२ वर्ष, राहणार खंडोबा गल्ली, देवणी.) परमेश्वर शंकर जगताप, (वय ३२ वर्ष, राहणार शिवनी तालुका भालकी जिल्हा बिदर) शिवराज व्यंकट पवार, (वय ३१ वर्ष, राहणार शिवनी तालुका भालकी.) लक्ष्मण नरसिंग चांदुरे, (४२ वर्ष राहणार होणाळी तालुका देवणी.) बसवराज बंडाप्पा महाजन, (वय ५८ वर्ष,



राहणार देवणी) अमर बालाजी माने, (वय २५ वर्ष, राहणार साळे गल्ली, लातूर.) नितीन राम सोनवणे, वय ३७ वर्ष, राहणार बौद्ध नगर, लातूर.) सुदर्शन जगताप सगर, (वय २३ वर्ष, राहणार एलआयसी कॉलनी, लातूर.) आशिष गणेश हासगुडे,( वय २८ वर्ष, राहणार रामवाडी तालुका जिल्हा उस्मानाबाद.) अतिक खाजापाशा सय्य, (वय २६ वर्ष, राहणार एलआयसी कॉलनी, लातूर.) शैलेश काकासाहेब जाधव, (वय २७ वर्ष, राहणार आदर्श कॉलनी, लातूर) बालाजी ज्ञानोबा कोकाटे, (वय ५० वर्ष, राहणार बौद्ध नगर, लातूर.) प्रकाश सोनाजी गायकवाड, वय ३२ वर्ष, राहणार बौद्ध नगर, लातूर. (मिलिंद सोनाजी गायकवाड,( वय ४० वर्ष, राहणार बौद्ध नगर, लातूर.) अर्जुन बालाजी माने, (वय ३८ वर्ष, राहणार साळे गल्ली, लातूर.)आकाश बालाजी साळुंखे, (वय २५ वर्ष, राहणार सोमवंशी नगर, आर्वी लातूर.) धनाजी सोपान बनाटे, (वय ४२ वर्ष राहणार भिंगोली तालुका शिरूर अनंतपाळ.) राहुल मनमत बिराजदार, (वय २७ वर्ष राहणार मोंढा रोड, उदगीर.) शशीकुमार जयपाल मेहत्रे,( वय २९ वर्ष, राहणार आंबेडकर चौक भालकी जिल्हा बिदर.) विलास शंकराप्पा शिंदे, (वय २९ वर्ष, राहणार आंबेडकर चौक, भालकी जिल्हा बिदर.) प्रदीप काकासाहेब साळुंखे, (वय २५ वर्ष, राहणार न्यूभाग्यनगर, लातूर), संतोष शेषराव जाधव ( वय ३० वर्ष, राहणार बालाजी नगर, लातूर.), प्रसाद शिवाप्पा बावगे, (वय ३० वर्ष, राहणार मंठाळे नगर, लातूर.), सुजित लक्ष्मण दामवाले, (वय २८ वर्ष, राहणार रोहिदास नगर, लातूर.), आशिष दत्तात्रय शेळके, (वय २४ वर्ष, राहणार जैन गल्ली, अंबाजोगाई जिल्हा बीड सध्या राहणार खोरी गल्ली, लातूर.) ओंकार राजकुमार झुंजारे, (वय २२ वर्ष, राहणार बजाज शोरूम च्या पाठीमागे, लातूर) गणेश अर्जुन शेंडगे, (वय २५ वर्ष, राहणार एलआयसी कॉलनी, लातूर) अक्षय गायकवाड, (राहणार बौद्ध नगर, लातूर) असे नमूद ठिकाणी ग्रुप करून स्वतःच्या फायद्यासाठी पत्त्यावर पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना व अनुक्रमांक (३८) अक्षय गायकवाड राहणार बौध्द नगर, लातूर हा गांधी चौक पोलीस ठाण्याचे हद्दीमधील ६० फूट रोडवर टाकलेल्या छाप्यामध्ये लोकांना जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे आढळून आले आहेत.

दोन्ही पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये टाकलेल्या छाप्यामध्ये वर नमूद इसमाकडून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, मोबाईलफोन व वाहने असा ०८ लाख एकूण १७ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमूद आरोपींचे विरोधात पोलीस ठाणे देवणी येथे कलम ४,५ जुगार अधिनियमा नुसार व पोलीस ठाणे गांधी चौक येथे १२(अ) मुंबई जुगार अधिनियमा नुसार दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश आलेवार, पोलीस अंमलदार खुर्रम काझी, रवी गोंदकर, दीनानाथ देवकते, यशपाल कांबळे, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, तुराब पठाण, राजाभाऊ मस्के, जमीर शेख, नकुल पाटील यांनी केली आहे.

## पाचोरातील पत्रकार संदीप महाजन यांच्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाईची



**वाडा/प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांच्यावर बुधवारी भ्याड हल्ला करण्यात आला. तत्पूर्वी त्यांनी दिलेल्या एका बातमीवरून संतापलेल्या किशोर पाटील यांनी अत्यंत अर्वाच्च, शिवराळ भाषेत महाजन यांना शिविगाळ केली. त्याचं रेकॉर्डिंग व्हायरल झाल्यानंतर उभा महाराष्ट्र नि:स्तब्ध झाला. एक लोकप्रतिनिधी, आमदार एवढी शिवराळ भाषा कशी वापरू शकतो असा प्रश्न महाराष्ट्राला पडला. किशोर पाटील यांनी केवळ शिव्याच दिल्या नाहीत तर महाजन यांना जीवे मारण्याची धमकी देखील दिली आहे. हे सारं संतापजनक आणि निषेधार्ह असल्याचे मत व्यक्त करून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची अपेक्षा वाडा तालुका पत्रकार संघाच्या वतीने व्यक्त केली आहे. पालघर जिल्हा अधिकारी, जव्हार विभागीय अधिकारी, वाडा तहसीलदार व वाडा पोलीस निरीक्षक यांना निवेदन देऊन या विषयात जातीनं लक्ष घालून चौथ्या स्तंभाच्या स्वातंत्र्याचं रक्षण करण्याच्या दृष्टीनं योग्य ती पाऊल उचलावे अशी मागणी वाड्यातील पत्रकार अशोक पाटील, संजय लांडगे, शशिकांत कासार, शेखर व्यापारी, अनिल पाटील, रुपेश मोकाशी यांनी केली आहे.

## राजकीय अस्थिर असताना जनतेला काँग्रेसचाच आधार -विश्वजीत कदम

**भिवंडी/प्रतिनिधी**



देशात व राज्यात राजकीय परिस्थिती अस्थिर आहे. राज्यात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भाजपाने खिंडार पाडले यातून राज्यात भाजपचीही ताकद कमी असल्याचे सिद्ध झाले असून अशा परिस्थितीत आता सर्वसामान्य जनतेला काँग्रेस हाच एकमेव आधार वाटत आहे असे वक्तव्य विश्वजीत कदम यांनी केले बुधवारी केले आहे. मुंबई नाशिक महामार्गावरील रांजनोली नाका येथील एका हॉटेलच्या सभागृहात आयोजित केलेल्या भिवंडी लोकसभा आढावा बैठकी प्रसंगी कदम बोलत होते. काँग्रेसचे ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या नेतृत्वाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे भिवंडी लोकसभा समन्वयक राजेश शर्मा,माजी खासदार सुरेश टावरे, माजी आमदार रशीद ताहीर, प्रदेश पदाधिकारी राजन भोसले, शेतकरी आघाडीचे पराग पष्टे, राणी अग्रवाल, काँग्रेस माथाडी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष छगन पाटील, काँग्रेस पदाधिकारी राकेश पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशात व राज्यात राजकीय हालचाली वाढलेल्या आहेत.२०१४ पासून भाजपाने जनतेची पिळवणूक सुरू केली आहे. खोटी आश्वासने, महागाई, बेरोजगारी यामुळे सर्व जनता त्रस्त झाली आहे.

काँग्रेस काळातील अनेक लोकोपयोगी कायद्यात बदल करून श्रीमंतांना फायदा पोहोचवण्याचे काम भाजपाने केले आहे. मनिपुर सारख्या दुर्दैवी घटनेकडे मोदी सरकार सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत आहे. भाजपाची स्वतःची राजकीय ताकद नसल्यामुळे त्यांनी नऊ राज्यातील विविध पक्षांचे सरकार फोडाफोडीचे राजकारण करून पाडण्याचे काम केले असून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे चांगले काम सुरु असताना केंद्रातील भाजपाने सोयीचे राजकारण करत शिवसेना आणि त्या पाठोपात राष्ट्रवादीत फूट पाडली. ज्या राष्ट्रवादी काँग्रेसवरती मोदींनी टीका केली मात्र अवघ्या तीन दिवसात चित्र बदलले आणि राज्यात राष्ट्रवादीला सोबत घेतले आणि मोदींना आपले टिकेचे शब्द गिळून घ्यावे लागले अशी टीका देखील कदम यांनी यावेळी केली. राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या भारत जोडो यात्रेची चर्चा जगात झाली आणि त्या मुळेच काँग्रेस आज संपूर्ण ताकतीने देशात उभा राहत आहे. भिवंडी लोकसभा हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला आहे. या ठिकाणी काँग्रेसला पोषक वातावरण आहे. त्यामुळे काँग्रेसला स्वतंत्र लढावे लागले तर भिवंडीत काय परिस्थिती आहे त्याची चाचणी या बैठकीच्या माध्यमातून करण्यात येणार असून लोकसभा क्षेत्रातील सर्व विधानसभेतील पदाधिकाऱ्यांची चर्चा करून त्याचा अहवाल आपण पक्षश्रेष्ठींना सोपविणार असल्याचे मत यावेळी विश्वजीत कदम यांनी व्यक्त केले.

## इंडसइंड बँकेच्या शाखेचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी**

इंडसइंड बँकेच्या नव्याने सुरू होत असलेल्या शाखेमधून ग्राहकांना तत्पर सेवा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून इंडसइंड बँकेच्या माध्यमातून येथील उद्योग व्यापाराबरोबर लातूरच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. लातूर शहरातील कामदार रोड येथील पहिल्या इंडसइंड बँक शाखेचा शुभारंभ शुक्रवार दि. १८ ऑगस्ट रोजी दुपारी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव-रमेश बियाणी, चार्टड अकाऊंटंट प्रकाश कासट, इंडसइंड बँकेचे सोलापूर विभाग प्रमुख- सतीश कुंकरे, मॅनेजर-संदीप सरवदे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, मनपाचे माजी सदस्य कैलास कांबळे, युनूस मोमीन, नागसेन कामेगावकर, दत्ता सोमवंशी, बाभळगाव ग्रामपंचायत उपसरपंच गोविंद देशमुख, अभिषेक पतंगे, ॲड.गोपाळ बुरबुरे आदीसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, इंडसइंड बँकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## कुडूस येथील शॉर्टसर्किटमुळे आग लागून दुकान भस्मसात

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील कुडूस येथील नाक्यावर असलेल्या एका दुकानाला रात्रीच्या सुमारास आग लागून दुकानातील साहित्य जळून खाक झाले असून यात मोठी आर्थिक हानी झाल्याचे बोलले जात आहे, सुदैवाने निवितहानी झाली नाही. कुडूस नाक्यावरील दुमजली इमारतिखाली असलेल्या पाटील वाईनशॉपला रात्री ११ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत दुकान, दुकानातील फर्निचर,फ्रीज, व मद्य साठा जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे असल्याची माहिती पाटील वाईन शॉपचे व्यवस्थापक नरेश पाटील यांनी सांगितले. बाजूलाच असलेली जव्हार अर्बन बँक ही आगीच्या भक्षस्थानी येण्याची चिन्ह असल्याने ग्रामस्थांची जीवाची बाजी लावून आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न केले. आग विझवण्याकरिता सुरुवातीला स्थानिक पातळीवर गावकऱ्यांनी आणि पोलीस प्रशासनाने जवळपास ४५ फायर सिलेंडर आणि ५० हून अधिक फायर बॉलचा वापर करण्यात आला होता. तरीही आग आटोक्यात येत नव्हती. भिवंडी निजामपूर, वसई विरार आणि पालघर अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते तर एका टँकरची सुद्धा व्यवस्था करण्यात आली होती. मंगळवारी पहाटे तीन वाजेपर्यंत ही आग विझवण्याकरिता स्थानिकांनी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. या आगीमध्ये वाईन शॉप चे अंदाजीत कोट्यावधी रुपयांची नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र अधिकृत आकडा अजूनही सांगता येणार नाही. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही. अनेक वेळा वाडा तालुक्यात आधीहि घटना घडल्या असून गेल्या कित्येक वर्षापासून प्रशासनाकडे अग्निशमन दलाची मागणी होत आहे. स्थानिक पातळीवर अग्निशमन दलाची व्यवस्था नसल्याने अनेक कारखान्यांना व दुकानांना आग लागल्यानंतर व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाल्याचे वारंवार समोर आले आहे. वाडा तालुक्यात कुठेही आग लागल्यानंतर अग्निशमन दलालाही नेहमी किमान ५० किलोमीटरचा प्रवास गाठून त्यातच रस्त्यांची दयनीय अवस्था असल्याने अनेक अडचणींचा सामना करत मोठी मशगत करत घटनास्थळी पोहोचावे लागते. तोपर्यंत मालमत्तेचा आगीने मोठे नुकसान झालेले असते. नेहमीच प्रशासनाच्या व अग्निशमन दलावर टाहो फोडण्यापेक्षा स्थानिक पातळीवर महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या मोठ्या स्वराज्य संस्था पुढाकार घेत अग्निशमन दलाच्या गाड्या येईपर्यंत प्राथमिक स्वरूपाने आग विझवण्याकरिता हाय प्रेशर इंजन बसवलेल्या टँकरच्या सुविधा का उपलब्ध करून ठेवत नाही हाही तेवढाच सवाल आहे.

## गुंज-बुधावली आश्रमशाळेतील मुलींना तरसे यांचे मार्गदर्शन



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील गुंज-बुधावली आश्रमशाळेत १५ ऑगस्ट रोजीच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्त्या आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध दक्षता नियंत्रण समितीच्या सदस्या श्रीमती राजश्री तरसे यांनी मुलींना आरोग्य, अत्याचार, स्वसंरक्षण बाबत मुलींना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे मोबाईल वरील चांगल्या मोबाईलचा वापर टाळा, मोबाईलवरुन चांगल्या गोष्टी सर्च करून आपल्या बुद्धी मत्तेमध्ये वाढ करा, आम्ही पाहतो, मुली दोन महिन्या पुर्वीप्रेमात पडलेल्या प्रियकर जवळचा वाटतो, पण जे आई-वडील त्या मुलीला मोलमजुरी करून लहानाचे मोठे करून शिक्षण देवून सज्ञान बनवितात, तेच पोलीस ठाण्यात ओळखत नाही असे सांगतात, त्यासाठी मुलींनी आपल्या जन्मदात्या आई-वडिलांचा सन्मान केला पाहिजे आणि त्यांच्या उपकाराची जाण ठेवली पाहिजे, आशा प्रकारे तरसे यांनी आश्रमशाळेतील आदिवासी मुलींना उपयुक्त मार्गदर्शन केले.

## अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात मेरी माटी, मेरा देश अभियानांतर्गत अमृत वाटिका वृक्षारोपण मोहिमेचे उद्‌घाटन

**वसई/प्रतिनिधी**



वसई येथील विद्यावर्धिनी शिक्षण संस्था संचलित अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे 'मेरी माटी मेरा देश' अभियानांतर्गत वसई विरार पालिकेच्या सहकार्याने 'अमृत वाटिका वृक्षारोपण मोहीम' राबवण्यात आली. ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त बुधवार दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे व उपस्थित शिक्षकवृंद यांच्या समवेत विद्यार्थी स्वयंसेवकांनी क्रांतिकारकांना श्रद्धांजली अर्पण केली व 'पंच प्रण प्रतिज्ञा' घेतली. 'मिटटी को नमन, वीरोंका वंदन' या उक्तीचा जागर करण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी दीप प्रज्वलित करून भारताच्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. 'मेरी माटी, मेरा देश' अभियानांतर्गत 'अमृत वाटिका' वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. स्वतः प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी वृक्षारोपण करून या मोहिमेचे उद्घाटन केले. याप्रसंगी वर्तक महाविद्यालय व भोवतालच्या परिसरात ७५ रोपट्यांची लागवड केली गेली. यामध्ये आवळा, वड, करंज, खाया, आंबा, रीहडा, बदाम, कदंब अशा पर्यावरपूरक वृक्षांचा समावेश होता. ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शत्रुघ्न फड, डॉ. भारती तोरणे व प्रा. आदिती यादव यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या मोहिमेत ९२ स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंद यांनी शुभेच्छा दिल्या.

## वॉटर फिल्टर प्लांट होणार 30 ऑगस्टच्या आत कार्यान्वीत

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा नगरपंचायतीकडून नगर वाशियांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेना वाडा शहर यांच्याकडून २७ जुलै रोजी वाडा नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन शुद्ध पाणिपूराठ्याची मागणी करून पंधरा दिवसात वॉटर फिल्टर प्लांट कार्यान्वीत झाला नाही तर आंदोलनाचा इशारा दिला होता. गुरुवारी (दि. १७) दिलेली मुदत उलटून गेली तरी शुद्ध पाणीपुरवठ्याची मागणी पूर्ण झाली नसल्याने आंदोलांच्या पवित्र्यात असलेल्या मनसैनिकांना तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी बैठकीला बोलवले यावेळी मुख्याधिकरी मनोज पष्टे सुद्धा उपस्थित होते. मनसैनिकांसोबत झालेल्या बैठकीत तहसीलदार अंधारे यांनी मध्यस्थी करून मुख्याधिकारी यांना विचारले असता ३० ऑगस्टच्या आत वॉटर फिल्टर प्लांट कार्यान्वीत असे अस्वासन दिले. ३० ऑगस्टला वॉटर फिल्टर कार्यान्वीत झाला नाहीतर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे व शहर अध्यक्ष मधुर म्हात्रे यांनी दिला. यावेळी उपतालुका अध्यक्ष संदीप महाकाळ, भरत गावित, दीपक ठाकरे, देवेंद्र भानुशाली, मनोज चौधरी, मनविसे जिल्हा उपाध्यक्ष निखिल बागुल, महिला तालुका अध्यक्ष उषा ताई मोरे, सचिव नम्रता भोये, मनविसे शहर अध्यक्ष हेमंत जाधव, शहर उपाध्यक्ष जयेश डेंगाने, उपशहर अध्यक्ष वैभव किणी, उपशहर अध्यक्ष आदेश डेंगाने शहर सचिव विजय बोरसे, शहर संघटक विपुल आंबेकर, महेश बुधर, रामू बुधर उपस्थित होते.




# इतिहास वाचलात तर इतिहास घडवाल -वसंतराव वाघमारे



**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात समाजाच्या सर्वच स्थरातील लोकांनी मनापासून सहभाग दिला आहे,अनेकांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून काम केले, अनेकांनी हौतात्म्य पत्करले,याचा इतिहास साक्ष आहेत,तथापि हर स्वातंत्र्य दिनी ठराविक व्यक्तींचीच नावे घेवून, अठरा पगड जातीतील हुतात्म्यांना सोईस्करपणे विसरले जातेय, अशी खंत व्यक्त करुन, विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना इतिहासही जाणीवपूर्वक वाचावा, समजून घ्यावा, त्याशिवाय तुम्ही इतिहास घडवणार नाहीत, असे प्रतिपादन माजी विस्तार अधिकारी वसंतराव वाघमारे यांनी येथे केले. मंगळवार दि.१५ ऑगस्ट २०२३ रोजी सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयाच्या स्वातंत्र्य सैनिक नगरातील विस्तारीत वाचन कक्ष अभ्यासिकेत, भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७६व्या वर्धापन दिन मेरी माटी, मेरा देश अभियांतनांतर्गत स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांचा सत्कार, तिरंगा ध्वजारोहण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाघमारे बोलत होते. अध्यक्षपदी परीट समाज महासंघाचे नेते गणतपराव तेलंगे होते. मंचावर सामाजिक कार्यकर्ते रामकुमार रायवाडीकर, साहित्यिक अमृतराव सूर्यवंशी, स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य महादेव राऊत यांची उपस्थिती होती. प्राचीन बळीराजाच्या काळापासून आपल्या माती, माणसांसाठी झटणारे राजे झाले. देशाच्या स्वातंत्र्य लढयात शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, बाबू गेनू, खुदीराम बोस, चंद्रशेखर आझाद, उमाजी नाईक, तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा, रायन्ना नायक अशा हजारो बहुजन देशप्रेमींनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले, यांच्या योगदानाकडे म्हणावे तसे पाहिजे जात नाही, नेहमी वाचाळ विरांचा उदोउदो होतो. त्यामुळे खरे स्वातंत्र्य आले की नाही असे वाटते, असेही सांगून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाच्या माध्यमातून इतिहासाचा मागोवा घ्यावा असे आवाहनही वसंतराव वाघमारे यांनी केले. देशाच्या स्वातंत्र्या नंतर मिळालेल्या भारतीय संविधानाने शेवटच्या माणसाला एक प्रकारचा आधार, धीर दिला होता, तो स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात पुन्हा डगमगतो आहे.ती सामान्यांतली अविश्वाची भावना घालविण्याचा संकल्प आज करु या असे मत रामकुमार रायवाडीकर यांनी व्यक्त केले. ग्रंथालयातून मिळाणार्या ज्ञानाने राष्ट्राचा ...पान ६ वर

# शेतकऱ्यांना एकरी १ लाख रुपयांची मदत करा; मनसेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन!




**लातूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात गत काही दिवसांपासून पाऊस नाही त्यामुळे पिके सुकली आहेत, अगोदरच उशिरा पेरणी झाली, काही शेतकऱ्यांचे बियाणे उगवले नाही, पीक गोगलगायीने खाल्ले, उरल्या सुरल्या पिकानी माना टाकल्या आहेत. पीक विमा कंपनीचे अधिकारी कर्मचारी पंचनामा करायला तयार नाहीत, अशा परिस्थितीत हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी करायचं काय असा सवाल करत मनसेने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मनसेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना एकरी एक लाख रुपयांची मदत द्यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी केली. या मागणीचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकार्यांना दिले आहे. मागणी मान्य नाही झाली तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. लातूर जिल्ह्यात पावसाने २१ दिवसांपासून उघडीप दिल्याने शेतकऱ्यांच्या पिकांनी माना टाकल्या असून पीक जिल्हाभर वाळत आहे तरी शासनाने जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत जाहीर करावी अशी मागणी मनसेचे सरचिटणीस तथा शेतकरी सेनेचे प्रदेशअध्यक्ष संतोषभाऊ ...पान ६ वर

# भिवंडी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्यासह कुटुंबीयांचे जीवन सुधारावे -आयुक्त अजय वैद्य




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी पालिकेत काम करणारे कर्मचारी विशेष करून सफाई कर्मचाऱ्यांना घाणीच्या ठिकाणी कामामुळे किंवा आजूबाजूच्या वातावरणामुळे काही व्यसनाची किंवा नशा करण्याची सवय लागते, तंबाखू, जर्दा, दारू अशा वेगवेगळ्या व्यसनांमुळे आरोग्य बिघडते आणि त्यामुळे आपण हळूहळू काम करण्यास असमर्थ होतो व त्याचा परिणाम आपल्या शरीरा बरोबर आपल्या कामावर तसेच आपल्या कुटुंबावर देखील होत असतो याकरता पालिकेच्या कामगार कर्मचारी यांनी सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहावे व आपले जीवन चांगल्या प्रकारे जगावे असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे.भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका व प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पीस पार्क कामतघर येथे आयोजित केलेल्या नशा मुक्ती कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीया विश्वविद्यालयाच्या अलका दीदी, डॉ.भारती घीवलीकर, बिंदू दीदी पालिकेच्या वतीने उपायुक्त सचिन माने, आरोग्य निरीक्षक जयवंत सोनवणे, उद्यान अधीक्षक निलेश संखे, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले उपस्थित होते. आयुक्त पुढे म्हणाले की या नशा मुक्ती केंद्राचा लाभ पालिकेच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी घ्यावा कोणतीही नशा ही जीवनाची ...पान ६ वर

# जुन्या पुलांवरील कठडे झाले धोकादायक



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील अनेक पुलांवरील संरक्षण कठडे अत्यंत धोकादायक अवस्थेत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डोळे झाकपणामुळे ही वेळ आल्याचे नागरिक सांगतात. तालुक्यातील मलवाडा, तिळसे, गांधरे गावाजवळ वैतरणा नदी पुल, पाली गावाजवळ पिंजाळ नदीवरील पूल अशा अनेक नद्यांवर पुलांचे संरक्षण कठड्यांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. तिळसे हे प्रसिद्ध पर्यटन क्षेत्र असून येथील पुलावरून मंदिरात थेट जाण्यासाठी मार्ग आहे. पुलावरूनच पर्यटक नदीच्या कुंडात फिरणारे मासे देखील बघत असतात. पुलाचे संरक्षक कठडे अनेक ठिकाणी उध्वस्त झाल्याने यातून अपघाताची शक्यता निर्माण झाली असून अन्य पुलांवर अशीच अवस्था जणू मृत्यूचा सापळा लावून बसलेली आहे. नविन उभारल्या जाणाऱ्या पूलांवर अतिशय बोगस पद्धतीने भरीव कठडे ...पान ६ वर

# विरार पोलिसांनी साजरा केला आगळावेगळा स्वातंत्र्यदिन; गहाळ झालेले १९ मोबाईल केले परत



**विरार/प्रतिनिधी**

७६व्या स्वातंत्रदिनाचे औचित्य साधून विरार पोलिसांनी मंगळवारी आगळावेगळा स्वातंत्रदिन साजरा केला आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ झालेले मोबाईल फोनचा तपास करुन १ लाख ८४ हजार रुपये किंमतीचे १९ मोबाईल फोन नागरिकांना परत केले आहे. त्यावेळी हजर असलेल्या नागरिकांच्या तोंडावर हास्य उमटले होते. विरार परिसरात चालु वर्षात नागरिकांचे मोबाईल फोन गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. वरिष्ठांनी प्रॉपर्टी मिसींग मधील मोबाईल फोनचा शोध तपास करण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने प्रॉपर्टी मिसींगचा तपास हाती घेतला होता.गहाळ झालेल्या मोबाईल फोनच्या तांत्रिक विश्लेषण करुन भारत देशातील वेगवेगळया राज्यांमधुन तसेच महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळया जिल्ह्यामधून गहाळ झालेले १ लाख ८४ हजार रुपये किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे १९ मोबाईल फोनचा शोध लाऊन ते प्राप्त करण्यास यश प्राप्त केले. पोलिसांनी हद्दीत गहाळ झालेले मोबाईलचा तपास करून हस्तगत झालेले १९ मोबाईल फोन १५ ऑगस्टला नागरिकांना देण्याचा ...पान ६ वर

# बांबू पैसा देणारे पर्यावरणपूरक पीक -महासंचालक नंदकुमार




**लातूर/प्रतिनिधी**

बांबू शेती ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी असून त्यासाठी लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बांबू लागवडीकडे वळावे. शासनाने सातारा आणि लातूर या दोन जिल्ह्यांचा बांबू लागवड मिशनमध्ये समावेश केला आहे. एक हेक्टर बांबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मनरेगा) तीन वर्षापर्यंत ७ लाख रुपये कुशल, अकुशल मजुरीच्या रूपात दिले जाणार असल्याची माहिती मनरेगाचे राज्याचे महासंचालक नंदकुमार यांनी येथे दिली. दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित बांबू लागवड कार्यशाळेत श्री. नंदकुमार बोलत होते. यावेळी माजी आमदार पाशा पटेल, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, एन. टी. पी. सीचे अधिकारी श्री. कदम, राजेंद्र शहाळे, बांबू विषयाचे अभ्यासक संजीव करपे, वन विभागाचे सेवा निवृत्त अधिकारी आणि बांबू लागवड तज्ज्ञ सलीम सय्यद, बांबू खरेदी व्यापारी संतोष राणे उपस्थित होते. आपण शेती करताना पाण्याचा वापर अतिशय जास्त प्रमाणात करतो. त्यामुळे आपले एकरी उत्पादन अत्यल्प आहे. पिकाला योग्य ते पाणी देण्याचं नियोजन केलं तर आपण मोठ्या प्रमाणात उत्पादन घेऊ शकतो. आता लातूर जिल्ह्यासाठी बांबू लागवड मिशन अंतर्गत शासनाने शेतकऱ्यांना मोठी संधी निर्माण करून दिली आहे. तुमच्या शेताची माती आणि त्यात येणारी बांबूची व्हरायटी याचा अभ्यास करून बांबू लावा. तुमच्या सर्वांना एक प्रश्न पडला असेल, बांबू लावू पण विकत कोण घेणार? त्याचे मार्केट कुठे आहे? त्याचे उत्तर आहे, आता थर्मल पावरमध्ये वीज निर्माण करण्यासाठी आपण दगडी कोळसा वापरतो त्यात ५ टक्के बांबू बायोमास वापरण्याचे केंद्र सरकारने नियम केला आहे. ही टक्केवारी भविष्यात वाढणार आहे. त्यासाठी हजारो टन बांबू लागणार आहे. त्याच बरोबर विविध प्रकारचे फर्निचर यापासून बनतात. त्यामुळे बांबू विक्रीला हमखास गिऱ्हाईक मिळणार असल्याची माहिती नंदकुमार यांनी दिली.लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी बांबू लागवड महत्वाची ठरणार ...पान ६ वर

# ७६व्या स्वातंत्र्य दिनी विद्यार्थ्यांना ७६ सायकलींचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी**

लातूरच्या आदर्श मैत्री फाउंडेशनच्या वतीने स्वातंत्र्याला ७६ वर्षे पूर्ण झाल्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना ७६ सायकलींचे वाटप राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोड यांच्या हास्ते करण्यात आले. यावेळी बोलताना आदर्श मैत्री फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे अनुकरण राज्यातील इतरही सामाजिक संघटनानी करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे यांची उपस्थिती होती. तर मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यंकट बेद्रे, प्रशांत पाटील, आदर्श मैत्रीचे अध्यक्ष संतोष बिराजदार, रमेश बिरादार, तुकाराम पाटील, बाबुराव जाधव, ओमप्रकाश झुरुळे, अंकुश नाडे यांची उपस्थिती होती. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आजही अनेक किलोमीटर पायी चालत शाळेत जातात. अशा गरीब होतकरू विद्यार्थ्यांचा शोध घेऊन फाउंडेशनच्या सायकल बँक उपक्रमात सायकल दान देण्याचे आवाहन आदर्श मैत्री फाउंडेशनतर्फे करण्यात आले. ज्यात अनेक दानशूर व्यक्तींनी जमेल त्या पद्धतीने सहकार्य केले. ज्यात स्वतः क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनीही आपल्या आईच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्त २१ सायकल व फौंडेशन चे अध्यक्ष संतोष बिराजदार व संचालकाच्या सहकार्यातून स्वातंत्र्याला ७६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ७६ गरजू विद्यार्थ्यांना ७६ सायकलींचे वाटप क्रीडा मंत्री संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पुढे बोलताना क्रीडा मंत्री बनसोडे म्हणाले की, आदर्श मैत्री फाउंडेशनचा या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांच्या जीवनात निश्चितच शैक्षणिक क्रांती येऊ शकेल. त्यामुळे फाउंडेशनच्या वतीने चालणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे अनुकरण राज्यातील इतरही सामाजिक संस्थांनी करण्याचे आवाहन केले.तसेच भविष्यात आपल्यालाही फाउंडेशनचा सदस्य संचालक होण्यास आवडेल असे ते यावेळी म्हणाले. शिक्षक आमदार विक्रम काळे ...पान ६ वर